# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०७/१०/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०७/१०/२०१३ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. ३०/०९/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सायं. ४.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजु यशवंत भोईर | सभापती |
| २. | श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो | सदस्य |
| ३. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. प्रमोद जयराम सामंत | सदस्य |
| ६. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७. | श्री. राजेश शंकर वेतोसकर | सदस्य |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | सदस्या |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| १२. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| १३. | श्री. संदिप मोहन पाटील | सदस्य |
| १४. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| १५. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| १६. | डॉ. रमेश जैन | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सन्मा. सदस्य, सदस्या तसेच प्रशासकीय अधिकारी यांचे स्वागत तसेच सचिव साहेब मिटींगला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. ०७/१०/२०१३ रोजी सायं. ४.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १५, दि. ३०/०९/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९८, दि. १५/०७/२०१३ व दि. २६/०७/२०१३ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. (दि. २६/०९/२०१३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८७)

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, आपण गेल्या वेळेला हे इतिवृत्तांत कायम केलं नाही याकरीता केलं नव्हतं की, अधिकारी वर्ग नव्हता आजही मला इथे विधी विभागाचे दिसत नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या एका साहेबांचा मॅसेज आहे की, "आय हॅव अ मिटींग ॲट कलेक्टर ऑफिस ठाणे रिगार्डींग बकरी ईद" तर हे काय आहे साहेब जर एकच अधिकारी परराष्ट्र मंत्रीसारखं त्यांच्याकडे तुम्ही जबाबदारी ठेवली असाल तर त्यांच्याकडे कोणतही खातं ठेवू नका. मा. सभापती साहेब, कुरळेकर साहेबांकडे कोणतही खातं नका ठेवू जनसंपर्क अधिकारीला द्या. अनुभव आहे त्यांना निवडणुकीचा अनुभव आहे. शासकीय अधिकाऱ्यांबरोबर त्यांचा संपर्क असेल साहेब, तुम्ही आयुक्त म्हणून बसता, ते सभापती म्हणून बसतात आम्ही बोलतो त्यामध्ये चुकुनही एखादा शब्द वापरला तर ते सुध्दा रेकॉर्डींग होणार आमच्या भावना वेगळ्या नाही पण ज्या खात्याची माहिती द्यायची आहे. त्या खात्याचा अधिकारी राहत नाही आणि आपल्याला मॅसेज पाठवणार चला बरं झालं गेल्यावेळी सावंत साहेब नव्हते, ते नव्हते, शिक्षण अधिकारी नव्हते ३-४ अधिकारी नव्हते. म्हणून तो प्रसंग आला होता ना की, ह्या प्रोसिडींगला मान्यता देऊ नका ते येतील तेव्हा द्या. ते कंन्सीडर झालं आता आपली महापालिका छोटी राहिलेली नाही लोकांचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन फार वेगळा आहे हे इतरांशी जे चालते त्याचप्रमाणे

आपली महापालिका कदाचित त्याच्या पुन्हा पाऊलाने चालली पाहिजे असं ही इथे राहणाऱ्या लोकांची अपेक्षा आहे किंवा आजुबाजुच्या महापालिकेतल्या लोकांची त्यांचं ही मत आहे. अधिकारी चांगले आहेत, सदस्य चांगले आहेत. कोणत्यातरी छोट्या कामासाठी हि सभा तहकुब होते. त्यावर वेगळी चर्चा होते. सभा आहे त्याची काळजी राहिली पाहिजे. आम्ही शिक्षण खात्याबद्दल विचारलं होतं आपल्या महापालिकेचं काय धोरण आहे? १२०० कोटीच्या महापालिकेचं धोरण काय आहे? खरोखर आपल्या महापालिकेची शाळा गरजवंतांसाठी, गरीबांसाठी आपली शाळा चालते की काय चालते? शाळेच्या इमारती त्याच्यात असलेली व्यवस्था, त्याच्यात असलेला कर्मचारी वर्ग, त्याच्यात असलेला शिक्षक वर्ग, मुख्याध्यापक त्यांच्याबद्दल आपली भुमिका काय आहे? आजही अनेक शाळांमध्ये रोज म्हणजे एका बाजुला शाळा चालते तर एका बाजुला स्पिकर वाजते. परवानगी कोण देते काय करते ह्याच काहीतरी बंधन आहे की नाही? बर्नड साहेब तुमचा मुलगा त्याच्यात शिकत नाही, माझा नातु शिकत नाही. पण ज्याचा शिकतो त्याला असं वाटते की मला कुठेच प्रवेश नाही मिळणार. फक्त महापालिका शाळेत प्रवेश मिळतो आणि तो जातेवेळी आपण आणखीन त्याच्या आयुष्याची बरबादी करतो याबद्दल कोणाला तरी खंत वाटते की नाही? आपण सन्मानित अधिकारी आहोत, आपण सन्मानित नगरसेवक आहोत या सभागृहाचे सदस्य आहोत गाव आपल्याकडुन अपेक्षा करते की, तुम्ही डोळ्यात तेल घालुन लोकांच्या भविष्यासाठी काम करता म्हणून मी निवेदन करतो तेवढं तुम्ही बोला. या महापालिकेतल्या ज्या शाळा ताब्यात आहे त्यांना तुम्ही कोणाकोणाला काय काय चालवायला परवानगी दिली? भंडारा चालवायला दिलं आहे. कोणाला भजन किर्तन करायला दिले, कोणाला हनुमान चालिसा बोलायला दिले. काय दिले ह्याची काही माहिती असेल तर त्याचं नीट निवेदन करा मी तुम्हाला आता सांगतो की, प्रभाग क्रमांक ३ या इमारतीमध्ये शाळा चालते आजही जे सभागृह चालते त्याच्यामध्ये जेवण होते जेवण झालं आपण गेल्यावर्षी विक्रम कुमार साहेबांना नेऊन दाखवलं. तिथे पाणी कुजलं होतं त्यांनी नाकाला रुमाल लावला. मी सांगितलं असं लावता येणार नाही इथे मुलं शिकतात तुम्ही आय.ए.एस. ऑफिसर आहात आयुक्त आहात. त्यांनी त्याच क्षणी तलाव सफाई करायला मंजुरी दिली. साहेब ४ दिवसाने काम चालु झालं आज पाणी स्वच्छ आहे. आज तिथे जेवण केलेलं ते उरलेलं जेवण ते तलावात टाकतात जे भाजी, मसाला उरते ते तलावात टाकतात. ते माशांना टाकतात म्हणजे माझ्या सारखा जो दान धर्म करणारा माणुस आहे त्याचं म्हणणं काय की, ते माशांना टाकतो. पुण्य माझ्या वाट्याला येते मी तीन-चार शाळेचं वर्णन करेल त्या शाळेमध्ये शाळा चालते, संडास, मुतारी, प्याऊ, ॲक्वागार्ड तर ॲक्वागार्ड मध्ये आता हिरवळ आहे. म्हणजे ज्याला आपण म्हणतो शुध्द पाणी प्यायचे ज्या ॲक्वागार्ड ने पाणी येतं त्याच्यात हिरवळ आहे, शेवाळ आहे, सगळे नळ उघडे आहेत. पाणी येत नाही संडासाच्या दरवाजाला कडी नाही. तिसऱ्या माळ्याचा संडास चालू नाही. तिथे आपला कोणता अधिकारी काम करतो? आपलं प्रभाग ऑफिस चालते, प्रभाग अधिकारी तिथे बसतात आणि त्याची अशी दैन अवस्था ही टिका नाही मी वस्तुस्थिती सांगतो नसेल तर इथून कोणी उठून जावे, बघावे तिसऱ्या माळ्यावर ते संडास जे आहे ते खराब आहेत आणि त्याच माळ्यावर कार्यालय चालते हे खरोखर बघण्यासारखं आहे का? उभं राहू नाही शकत. मी सकाळी व्हीजीट देऊन आलो त्याचं हे निवेदन करतो कोणीतरी मला फोन केला असं नाही. कुठे कुठे आपण परवानगी दिली. बंदरवाडीची शाळा ही आपण गणपतीसाठी देतो विनंती करायला पाहिजे मला ह्याच्यात तक्रार नाही सगळे आपले समंजस लोक आहे. गणपतीच्या अगोदर महिनाभर मंडप बांधायला घेतात. गणपती गेला अजून मंडप सुटला नाही. पोरांनी शाळेत जायचं की नाही? बाहेर तुमचे दरवाजे तर सांगा त्यांना चांगली जागा द्या. आता नवघर शाळा आहे. नवघर शाळेत ज्या दिवशी कृत्रिम तलाव बोलायचं झालं. माझं रेकॉर्डींग आहे की, तुम्ही ही तलावाची जागा बदल, शाळेमध्ये घेऊ नका. तरी तुम्ही केला त्यात जेसीबी पडली. पोरांच्या समोर ती जेसीबी आतमध्ये गेली ती बाहेर काढली परत खड्डा बदलला परत खड्डा बुजवला. आता तिथे परत मंडप बांधला. तो मंडप बांधला त्याला कॉंक्रिट केलं. मंडप कोणाच आहे त्याला काही नाही. मंडप हे आपल्याशी संबंधीत आहे. सगळे पॉलीटीकल लिडर आपलेच आहेत पण कशासाठी आपण देतो एवढे लाखो रुपये खर्च करतात. कोणतीही पार्टी खर्च करायची हौस आहे ना तर त्यांच्याकडुन मैदान विकसित करुन घ्याना ह्यांची राष्ट्रवादी असेल त्यांचा काही कार्यक्रम असेल त्यांना एक दत्तक द्या. मी भाजपवाला आहे आम्हाला ही दत्तक द्या. शिवसेनेवाले आहेत त्यांना दत्तक द्या. तुम्ही अशा पध्दतीने डेवलप करुन द्या की, लोकांसाठी कायमचे राहतील. आपण गरीबांच्या मुलासाठी शाळा चालवतो कोट्यावधी रुपये खर्च करतो. त्याच्यावर काहीतरी नियमावली ठरली पाहिजे. मी आताही बोलतो आणि त्यावेळी विक्रम कुमार साहेब होते तेव्हा ही बोललो होतो. मी ज्यादिवशी शाळेवर उतरलो तेव्हा “काय गं सखु बोला दाजीबा” हा डी.जे. चालु होता. एका बाजुला कार्यक्रम चालु आहे मग त्या आयुक्त साहेबांनी ऑर्डर दिली आणि ते बंद केलं एक नियमावली नक्की ठरवा पाहिजे असेल तर स्टँडींग चा ठराव आज करा उद्या करा कधीही करा पण त्याला काहीतरी करा जेणेकरुन आणि पटसंख्या घसरणार नाही आता आपण किती कठीण प्रसंगामध्ये आहोत माहिती आहे का? याचं अनुदान येते. मोहिते साहेब लक्षात घ्या जर एवढ्या तुकड्यांची मान्यता काढली तर किती सरप्लस मास्तर होतील आणि कुठे जातील? असा विषय आहे. माझ्या मुलाला शिकवायचं आहे मला ती शाळा नसणार तिकडच्या तिकडे मुलं सगळी वर्ग करायला लागतील. अशी पाळी येईल आणि एवढ्या मोठ्या विषयाकडे आपल्या कोणाचं लक्ष नाही असंही मी म्हणत नाही मी तुमच्या लक्षात आणून देतो गांर्भियाने विचार करा. गांर्भियाने निवेदन करा चांगला सन्मानित तोडगा काढा.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शाळांना आरटीए नूसार दहा मुलभुत सुविधा देणं गरजेच आहे. काकांनी सांगितल्याप्रमाणे ज्या ज्या शाळेमध्ये ज्या काही दुरुस्त्या आहेत त्याबद्दल या अगोदर ही संबंधीत विभागांना कळविलेलं आहे. पुन्हा एकदा वस्तुस्थिती बघुन त्यानुसार बांधकाम विभाग किंवा संबंधीत विभागाकडे पाठपुरावा केला जाईल आणि लवकरात लवकर व्यवस्थित होईल ह्याची काळजी घेऊ.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण खारीगाव शाळेबद्दल बांधकाम खात्याला काही सुचना दिल्या का? मग त्यांनी ते संडास दुरुस्त नाही केले का? किंवा आरोग्य खात्याने सफाई करायचं त्यांनी ते केलं नाही असं घ्या तुम्ही सांगितलं त्यांनी ऐकून घेतलं नाही घेतलं नुसतं गेलं असं होत नाही.

**शरद पाटील :-**

तुम्ही बांधकाम विभागाला ह्याची माहिती दिली आहे का?

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

यापूर्वी दिलेली आहे. पुन्हा एकदा आता वस्तुस्थिती दर्शक अहवाल जो जो आहे................

**शरद पाटील :-**

दिलेली आहे मग केलं नाही तर त्यांनी पण त्याचं उत्तर द्यावं ना.

**मा. सभापती :-**

तुम्ही पाहणी करुन सर्व माहिती आणि कामं सांगता का?

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

एका शाळेत नाही बऱ्याच शाळांमध्ये प्रॉब्लेम आहे. आपल्याकडे एकुण ३५ शाळा आहेत १९ इमारती आहेत.

**मा. सभापती :-**

साहेब, तुम्ही सर्व शाळांची पाहणी करा आणि जे काय काम असेल बांधकाम विभाग असु द्या किंवा आरोग्य विभाग असु द्या त्यांना पत्रानिशी कळवा आणि ती काम करुन घ्या.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

प्रत्येक मुख्याध्यापकांकडुन काय दुरुस्ती आहे किंवा काय आहे ती वस्तुस्थिती घेऊन त्याप्रमाणे त्या त्या विभागाला पुट अप केलं आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ह्या विषयावर मला बोलायचं आहे आपल्या ज्या शाळा आहेत प्राथमिक विभागाच्या किंवा महापालिकेच्या तिथे आपलं आरोग्य केंद्र चालु आहे आणि आमच्या नवघरला असं आहे की, तिथे टी.बी. चं केंद्र चालते तर त्याची तिथे आवश्यकता आहे का? टी.बी. हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे त्याचा प्रार्दुभाव तिथे शाळा शिकणारी पोरं आहेत किंवा इतर जाणारी लोक आहेत त्यांना होऊ शकतो त्या विषयी मी आरोग्य विभागाला कळविलं होतं परंतु, त्याचं काहीच झालं नाही तर हे किती गांर्भियाचं आहे?

**डॉ. पडवळ :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो, साहेबांचं पत्र मिळालेलं होतं की, नवघर आरोग्य केंद्रामध्ये टी.बी. चं केंद्र चालु आहे त्यामध्ये इतर पेशंन्ट येतात तर ते बंद करावं किंवा इतरत्र ठिकाणी हलवा असं त्यांचं पत्र होतं तर सर्व सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की, आपलं इंदीरा गांधी हॉस्पीटल सहित सर्व आरोग्य केंद्रामध्ये जनरल पेशन्ट आणि टी.बी. चे पेशन्ट सर्व एकाच ठिकाणी पाहिले जातात आणि डॉट्स कार्यक्रमांअंतर्गत आपल्या सर्व आरोग्य केंद्रामध्ये डॉट्स ची औषधे ठेवलेली असतात ती खाण्यासाठी रुग्ण त्याठिकाणी एक दिवस आड येत असतो तर ज्या नविन गाईड लाईन्स आहे त्यानुसार की, टी.बी. चं असे ॲक्युलेशन ठेवायची गरज नाही आणि त्याठिकाणी इतर येणारे जे रुग्ण आहेत त्यांना याच्यातुन असा काही वेगळा धोका संभवतो असं काही नाही. कारण आपण त्या रुग्णांना प्रिकॉशन घ्यायला सांगितलेलं असते. पहिलाच डायग्नोसिक झाल्यानंतर व्हिजीटमध्ये कन्सल्टींग करतो की, कफ मॅनर्स म्हणून कसे पाळायचे म्हणजे खोकताना तोंडापुढे हात रुमाल धरणं, शिंकताना, खोकताना, बोलताना हातरुमाल धरणं ही सर्व माहिती त्यांना दिलेली असते कारण पेशन्ट स्वतःच्याच घरी राहत असतो. सगळ्यात जास्त धोका त्या रुग्णाच्या घरी राहणाऱ्या सदस्यांना असतो, लहान मुलांना असतो त्याच्यामुळे ह्या सर्व गोष्टीचं काटेकोरपणे पालन करतात.

**प्रविण पाटील :-**

साहेब, माझं म्हणणं एवढचं आहे की, आता केंद्र चालु आहे त्याच्यामुळे इतरांना त्रास होऊ शकेल का?

**डॉ. पडवळ :-**

नाही.

**प्रविण पाटील :-**

आणि त्याचा तुमचा रेषो काय आहे? पहिला किती रुग्ण होते आणि आता किती आहे? त्याचा तुमच्याकडे अंदाज आहे का? वाढलेले आहे की फरक पडलेला आहे?

**डॉ. पडवळ :-**

याचा रेषिओ आहे टी.बी. चे साधारण १ लाखात २१६ रुग्ण असतात.

**प्रविण पाटील :-**

ते नाही मी फक्त त्या विभागाबद्दल बोलतो.

**डॉ. पडवळ :-**

तसा रेषिओ आपण काढत नाही. कारण तसं मायनर ह्याच्यावर व्हेरीफिकेशन होत नाही एकदम खालच्या सॅम्पल सहीत कमी करतो.

**प्रविण पाटील :-**

मला फक्त हे विचारायचं आहे की, पहिल्यापेक्षा पेशन्ट वाढलेले आहे की, कमी झालेलं आहेत.

**डॉ. पडवळ :-**

तेच सांगतो टी.बी. चे पेशन्ट हे रेट आहे ते १ लाखाला २१६ पेशन्ट आहे तर ते तसेच राहणार आपण कितीही पेशन्ट बरे केले तरी त्याची जोपर्यंत................

**प्रविण पाटील :-**

पेशन्ट आहे ते ठिक आहे पण त्याच्यामध्ये वाढले का?

**डॉ. पडवळ :-**

केंद्रावर पेशन्ट तर वाढणारचं आहे.

**प्रविण पाटील :-**

ह्याच्यामुळे टी.बी. चे पेशन्ट तर वाढलेले नाही ना.

**डॉ. पडवळ :-**

नाही. त्याच्यामुळे वाढले असं बिलकुल नाही कारण, याच्याबाबत शासनाचे सुस्पष्ट निर्देश आहेत आणि त्यानुसारच आपण करतो तसं असंत तर शासनाने स्पष्ट सांगितलं असते.

**प्रविण पाटील :-**

भविष्यात असा काही धोका आहे का?

**डॉ. पडवळ :-**

भविष्यात पण काही धोका नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, डॉक्टर साहेब सांगतात तर त्यांच्या निवेदनामध्ये पण तथ्य असेल पण, सायकोलॉजी असं लोकांच्या डोक्यामध्ये घुसलं की, हा टी.बी. चा पेशन्ट आहे आणि टी.बी. चा पेशन्ट जातेवेळी माझा मुलगा, माझी मुलगी तिथुन जाते तर ते आरोग्याला खरोखरच हानीकारक आहे की नाही? २ मत पडु शकतील जर तुम्ही असा प्रयत्न केला तर टी.बी.चं सेंटर चालते. नियमानुसार नाही. आग्रह तसा नाही पण प्रयत्न केला की, शाळेपासून दुर ठेवायचा प्रयत्न केला तर असा जो प्रश्न सन्मा. सदस्यांनी विचारलेला आहे किंवा लोकांच्या मनाचा शंका कुशंका तिथे बसणाऱ्या उठणाऱ्या लोकांना कारण त्या शाळेमध्ये जॉगिंग प्लॉट पण आपला आहे. सकाळी मुलं येतात, लोकं येतात, म्हातारी कोतारी येतात जर ते सेंटर बाहेर काढणे शक्य आहे का असं सांगा? असं असेल तर आपली शिवरेज प्लान मध्ये चांगली इमारत आहे ती अशीच खाली आहे त्याच्यामध्ये टी.बी. चं सेंटर म्हणून चालू करता येईल का? कारण ते एका बाजुला होईल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

काका, आप सायकॉलॉजी बोल रहे है ना तो टी.बी. सायकॉलॉजी के उपर जनता के सायकॉलॉजी का काम करेंगे तो अलग है। तो अपना सारा जो प्रोग्राम है वह कॅन्सल करेंगे तो खराब हो जाएगा। यह सायकॉलॉजी गलत है और हम जो कर रहे है वह सही कर रहे है।

**शरद पाटील :-**

डॉ. साहेब तुम्ही आता उत्तर दिलं ते सोप्या भाषेत दिलं नाही फार कठीण भाषेत दिलं ते आमच्या डोक्यात आलं नाही तुम्ही सोप उत्तर द्या की, ते संसर्गजन्य रोग नाही त्याच्याने कोणाला त्रास होणार नाही पेशन्ट वाढत नाही एवढं बोला ना.

**प्रविण पाटील :-**

साहेब, हा अति संसर्गजन्य रोग आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, आपण आरोग्य विभागाकडे मागणी केलेली आहे त्यांनी जे काही सोसायट्यांमध्ये पाणी आणि तेथील राहणारे नागरीक आहेत त्यांचे रक्त तपासणी गट, त्यांची चाचणी सुरु केलेली आहे. डेंग्युच्या बाबतीत तर माझं तसं आरोग्य विभागाला पत्र आहे की, त्यांनी ज्या आपल्या महानगरपालिकेच्या शाळा आहेत त्या शाळांमध्ये पण तसे पाण्याची चाचणी आणि तेथील विद्यार्थ्यांचं रक्त तपासणी ही पण त्या मार्फत सुरु करावी आणि शिक्षण विभागाने गेल्या वेळेला इतिवृत्तांतामध्ये म्हटलं आहे. दि.२७/०६/२०१३ ला की, आपण त्या विद्यार्थ्यांचा विमा काढणार होतो तर तो विमा काढण्यात आला का?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अगर सभी का तपासणी किया अगर वास्तव मे इन्होंने सजेशन दिया और बोल दिया तो नगरपालिका को बेहिसाब खर्च करने को मिल जाएगा क्योकी, यह तपासणी वहाँ करनी चाहिए जहाँपर क्लीनीकल सिमटम्स हो नही तो हम जाँच किए जाऐंगे मालुम पडा की, हजारो नही लाखों का जॉच किया और कुछ भी नही आया। आप उस अधिकारी को ऐसे अधिकार मत दो................

**प्रशांत दळवी :-**

हमने अधिकार नही दिए है। सन्मा. सदस्य राजेंद्र जैन आप सुनो मै क्या बोल रहा हूँ। उन्होंने सर्व्हे चालु किया है। सोसायटी मे जाके सर्व्हे चालु किया है। तो अपनी यह महानगरपालिका का स्कुल है................

**मुन्ना सिंह :-**

किस चीज का सर्व्हे चालु है।

**प्रशांत दळवी :-**

पालिका चेक अप जे रहे है। नमुना ले रहे है। प्रत्येक रुममध्ये आमच्या वॉर्डामध्ये आरोग्य विभागाने चालू केलेली आहे.

**मुन्ना सिंह :-**

मा. सभापती साहब, आरोग्य खातेवाले बिल्डींग मे जा रहे है। जिसकी बिल्डींग मे डेंग्यु हुआ है वह बिल्डींग का सब गिनती कर रहे है। सर्व्हे करेंगे तो पुरा करीए ना।

**प्रशांत दळवी :-**

आपण वॉर्ड ने जे कार्यक्रम घेतलेलं आहे डेंग्युच्या बाबतीत तर आपली टीम तिथे फिरते, डॉक्टर फिरतात तर तीच टिम आपण प्रत्येक महानगरपालिकेच्या शाळांमध्ये फिरवावी.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

फिरवतो. वॉर्ड झाल्यानंतर शाळेमध्ये करणार आहोत. सिमटम्सवाले आहे त्यांना सर्वांचे नाही करत.

**प्रशांत दळवी :-**

पाण्याचे नमुने..............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ज्या ज्या ठिकाणी ब्रिडींग स्पेसेस आहेत त्याठिकाणी पाण्याचे नमुने घेतो लारवा आहे की नाही ते बघतो आणि ज्यांना ताप आहे त्यांचे सॅम्पल घेतो.

**प्रशांत दळवी :-**

शाळेमध्ये चाचणी करायला काय फरक पडतो?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

करु ना वॉर्ड झाल्यानंतर करु.

**मुन्ना सिंह :-**

मा. सभापती साहब, अभीतक मिरा भाईंदर मे डेंग्यु के पेशन्ट कितने है?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ओ.सी. चे ५६१ आहेत आणि मनपाचे ४२ आहेत.

**मुन्ना सिंह :-**

उसमे ऑफ कितने जन हूए?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

यह सस्पेक्टेड है।

**मुन्ना सिंह :-**

अभीतक कोई ऑफ नही हुआ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दो हुए है।

**मुन्ना सिंह :-**

कहाँ के पेशंट थे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मिरारोड का एक था और एक बॉम्बे मे था।

**मुन्ना सिंह :-**

बॉम्बे हॉस्पीटल मे था लेकीन था किधर का वह?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इधर का था।

**मुन्ना सिंह :-**

इधर का मतलब कहाँ का था?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

भोला नगर का था।

**मुन्ना सिंह :-**

रावल नगर मे एक पेशंट मरा है।

**रोहिदास पाटील :-**

आपलं असं सर्क्युलर गेलं का? सगळ्या महापालिका हद्दीतल्या सगळ्या डॉक्टरांना जर तुमच्याकडे संशयिक डेंग्यु पेशन्ट आढळला तर महापालिकेला कळवा असं कम्पलसरी केलं का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, काकांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. सगळे पॅथलॉजी लॅबोरेटरीला जातात डॉक्टरांचं कम्युनिकेशन आमचं असतं ती माहिती आमच्याकडे अपडेट असेते त्याच्यामुळे ४६२ सस्पेक्ट सापडले ते खाजगीमध्ये सापडले आणि आपल्याकडे ४२ सापडले.

**रोहिदास पाटील :-**

पानपट्टे साहेब, जेव्हा असा विषय येतो हे रेकॉर्डवर कुठे आहे? जर तुमचं सर्क्युलर अमुक दिवशी सही करुन काढलं संबंधीत हॉस्पीटलला पोचलं असं रेकॉर्डवर राहण गरजेचं आहे मी पुन्हा पुन्हा सांगतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काका तसं कळवलं आहे पण अजुन एकदा कळवतो.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो विद्यार्थ्यांचा अपघात विमा हा राज्य स्तरावर काढला जातो. शासन त्याच्यासाठी ठराविक रक्कम म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी इंन्शुरन्स कंम्पनीला देतो जो कोणी विद्यार्थी ज्याचा अपघात झाला असेल त्याचा क्लेम प्राथमिक शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे करावा लागतो त्यानंतर क्लेम पालकांनी करायचा असतो.

**प्रशांत दळवी :-**

आपण तशा सुचना पालकांना कळवलं का? आपल्या ह्या ज्या योजना आहेत त्या पालकांपर्यंत पोहचतच नाही. मुलांचे ॲक्सीडंट होतं, काही होतं. तर त्यांच्यापर्यंत योजना पोहचविण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब, शासनाच्या बऱ्याच योजना असतात तर आपलं जे समाज कल्याण विभाग आहे त्याच्यामार्फत ती प्रसिध्दी व्हावी असं आम्हाला वाटंत बऱ्याच योजना असतात त्या लोकांपर्यंत पोहचतचं नाही अशा ज्या योजना आहेत त्या आपला समाजकल्याण विभाग जो आहे त्यांच्यामार्फत व्यवस्थित प्रसिध्दी झाली तर त्याचा उपभोग लोक घेऊ शकतात.

**प्रशांत दळवी :-**

पान क्रमांक १४ मध्ये स्टेशन परिसरात मिरारोडला एक विरेंद्र ठाकूर नामक इसमांनी नगरपालिकेवर गेल्या ९ वर्षापूर्वी दावा दाखल केलेला आहे तर तो दावा त्यांनी दाखल केला आहे ती जागा आपली आहे का? २००१ ला त्यांनी दावा दाखल केलेला आहे त्यांनी तिथे अतिक्रमण केलेलं आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते, ती जागा कोणाची आहे ते मला सांगता येणार नाही. पण दाव्यामध्ये त्यांचं म्हणणं असं आहे की ते जे बिल्डर आहे त्यांनी त्यांना ती जागा दिलेली आहे.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम, २००१ ला आपल्या विरोधात त्यांनी दावा दाखल केला आहे आज नऊ वर्ष झाली.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर त्याच्यामध्ये काय झालं होतं आपण २००५-०६ मध्ये जेव्हा ते बांधकाम काढायचा प्रयत्न केला होता तेव्हा त्यांनी आपल्या विरुध्द कंम्प्लेंट फाईल केला होता. मग दाव्या ऐवजी कंटेम्प्ट चालंलं होतं. कंटेम्प्ट आता डिसमिस करुन घेतलेलं आहे. आता दावा जो आहे साक्ष पुराव्यासाठी प्रलंबित आहे.

**प्रशांत दळवी :-**

ही केस आपण किती वर्ष पुढे चालवत राहणार ०६/०८/२०१३ ला हा दावा डिसमिस करणार होतो अशाप्रकारचं आपलं वक्तव्य होतं.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर, त्यादिवशी तुम्हाला जे स्टेटमेंट केलं होतं तो दावा डिसमिससाठी केला होता त्यांनी इमिजिएटली दुसऱ्या तारखेला त्याच्यामध्ये साक्ष पुरावा दाखल केलेला आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझ्या माहितीप्रमाणे ६०० फुट जागा ते वापरत आहे. २०० फुटावर स्टे आहे बरोबर आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो बरोबर आहे.

**प्रशांत दळवी :-**

आपली ज्यावेळेला चर्चा घडुन आली त्याच्यानंतर त्यांनी आणखीन एक स्टे घेतलेला आहे त्याची कॉपी आपल्या कडे आली असेल ना.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

बरोबर आहे कॉपी आली आहे.

**प्रशांत दळवी :-**

साहेब बघा आपण इकडे स्टँडींग कमिटीचे लोक बसतो, चर्चा करतो त्याठिकाणी, त्यादिवशी आपण चर्चा केली की ६०० फुटावर स्टे आहे, २०० फुटावर स्टे आहे, ६०० फुटाची तो जागा वापरतो. लोकांना तिकडे नाहक त्रास होतो बाहेर येण्या जाण्यासाठी प्लॅटफॉर्मवरुन त्यानंतर ही मिटींग झाल्यानंतर त्या इसमाने परत महानगरपालिकेवर ४०० फुटासाठी दावा दाखल केला.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

तो स्टे आता नाही तो दुसरा जो नविन दावा दाखल केलेला आहे त्यांच्या मुलानेच केलेला आहे. तर त्यात स्टे नाही आहे आता.

**प्रशांत दळवी :-**

पण त्यांनी दुसरा दावा दाखल केला ना.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो दावा दाखल केला.

**प्रशांत दळवी :-**

मग, स्टे नाही तर ते आपण वॅकेन्ट का करत नाही?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर, त्यात वस्तुस्थिती अशी आहे की आपण त्या गाळ्यांना परवाना दिलेला आहे तो परवाना रद्द केल्यानंतर आपण त्याच्यात काढणार १० मे २०१३ ला आपण त्यांना वडापाव सेंटर चालवायला परवाना दिलेला आहे.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम, मी वडापाव सेंटरच बोलत नाही मी ज्युस सेंटरचं बोलतो. वडापाव तिकडे आहेतच नाही कोणता गाळा सांगता त्यांनी आपल्या जागेवर अतिक्रमण केलं आहे २०१३ ला तुम्ही परवानगी कशी देणार?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर, त्याच्यामध्ये दोन दावे आहेत शुगर केन ज्युस सेंटरचा वेगळा २००१ पासुनचा दावा आहे आणि आता जो नविन दावा दाखल झाला आहे तो वडापाव सेंटरसाठी दाखल झाला आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्याच ठिकाणावर दावा दाखल झाला आहे. परंतु, तिथे ज्युस सेंटर आहे वडापाव सेंटर नाही तेवढी मोठी जागा त्यांनीच एक्वायर केलेली आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

टोटल ४०० आहे २०० ला आहे आणि २०० ला नाही.

**दादासाहेब खेत्रे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, २००१ पासुन विरेंद्र ठाकुर ने २०० फुटात त्यांना आता जो दावा दाखल केलेला आहे त्यात स्टे नाही तर ती मी ८ दिवसात जागा वॅकेन्ट करतो.

**प्रमोद सामंत :-**

८ वर्षापासुन आहे ८ दिवस कशाला सांगता? लगेच करा ना.

**दादासाहेब खेत्रे :-**

आपण त्याच्याकडे ना हरकत दाखले दिलेले आहे ते त्या विभागाकडुन रद्द करुन ती जागा पोलिस बंदोबस्त करुन वॅकेन्ट करतो.

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त महोदय, त्यांनी २००१ ला आपल्या विरोधात दावा दाखल केलेला आहे त्याच्यानंतर कोणत्या विभागाने परवाने दिलेले आहे ते पण तपासून पहा आपण त्यांना परवाना देतो तो आपल्या विरोधात कोर्टामध्ये दावा दाखल करतो आणि आपण त्याला स्टॉल चालविण्यासाठी परवानगी देतो हा काय प्रकार आहे?

**दादासाहेब खेत्रे :-**

८ दिवसात मी काढुन देतो.

**राजेश वेतोसकर :-**

त्यांना मुळात परवानगी ही बेकायदेशीर दिलेली आहे.

**संदीप पाटील :-**

खेत्रे साहेब, ज्यादिवशी आमची स्टँडींग अस्तित्वात आली त्या दिवसापासून त्यांची ही चर्चा आहे वर्ष व्हायला होत अजुनपर्यंत खुलासा होत नाही.

**दादासाहेब खेत्रे :-**

साहेब, मी ते स्वतः तोडलं होतं ती जागा त्यांनी स्टे घेतला तद्नंतर स्टँडींगमध्ये चर्चा झाल्यानंतर मा. आयुक्तांच्या आदेशानुसार मी स्वतः ती जागा खाली केलेली. पेपर स्टॉल आहे. पेपर स्टॉलच्या मागे जागा मोकळी आहे. आणि ती मी स्वतः वॅकेन्ट केली होती. परंतु, त्यांनी परत जाऊन त्या जागेसाठी स्टे घेतला म्हणून थांबलो होतो. आणि आता मा. विधी अधिकारींनी कळवल की, त्या प्रिमायसेसमध्ये स्टे नाही. त्याच्याकडे नाहरकत दाखले आहे. ते आम्ही रद्द करतो.

**प्रशांत दळवी :-**

इकडे कोण जर ऐकुन घेणार नसतील तर पुढची जी तारीख पडेल त्यावेळेला तिकडचा स्थानिक नगरसेवक म्हणून मी कोर्टाला ॲफिडेव्हीट करणार आहे. कारण हा जनहिताचा प्रश्न आहे. मी वेळोवेळी वारंवार या ठिकाणी भाष्य केलेल आहे. आपले विधी विभाग आहे. परंतु, तो डिसमिसला ठेवलल आहे. डिसमिसला ठेवलेल असताना डिसमिस झाला नाही. तो ६ ऑगस्टला डिसमीस होणार होता. तो डिसमीस झाला नाही. वरुन त्याने परत जाऊन हि जी चर्चा घडवून आणली ४०० फुटाचा वाढीव त्यांनी परत स्टे घ्यायचा प्रयत्न केला. त्यांनी दावा दाखल केला आहे. तशाप्रकारच पत्र त्यांनी कळवल आहे ना नगरपालिकेला. ज्यांच्या सहीने परवाने दिलेले आहे. त्यांच नाव इथे नाहिर करण्यात याव. त्यांना कोणत्या आधारावर परवानगी देण्यात आली? कोणते पेपर दाखवले? की मी नगरपालिकेच्या विरोधात स्टे घेतला आहे. मला परवाना द्या म्हणून.

**अतिरिक्त आयुक्त :-**

परवानगी दिलेली आहे. परंतु, त्याची सुनावणी घेऊन त्याचा निर्णय घ्यावा लागेल. नंतर त्याला १०० चौ. फुटाची परवानगी आहे. पण आता रिसेंटली दिलेली परवानगी आहे. ती हेअरींग घेऊन रद्द करुन ताबडतोड कारवाई करायला सांगतो.

**शरद पाटील :-**

साहेब, या अतिक्रमण विभागाकडे जेवढे अधिकारी आहे त्यांना सोयीच असत जिथे करायला पाहिजे. तिथे जाऊन ताबडतोब करतात. मग, तिथे स्टे असु दे काही असु दे ते त्यांना करता येत. आता एका ठिकाणी अशी गोष्ट झाली की तिथे स्टे असताना आम्हाला सांगितल. ते पडायला आल त्यामुळे ते तोडायच आहे. प्रत्येकाला जिथे सोयीच असत तिथे बरोबर अतिक्रमण विभाग जातो. आणि तिथे बरोबर तोडायच काम करतो.

**राजेंद्र जैन :-**

साहब हेअरींग वाला आपको बोला ना विधी अधिकारी मॅडम को मालुम है। हेअरींग लेने का अधिकार आयुक्त को है की, वह हेअरींग का अधिकार दे की नही दे। ऐसे केसेस में? जिस केस के अंदर स्टे वैगेरा कुछ भी नहीं है। उसमें हेअरींग देने का कुछ भी जरुरी नहीं है। ऐसा भी पुणा का फैसला आया हुआ है की, उसे हेअरींग देने की जरुरत नहीं है।

**अतिरिक्त आयुक्त :-**

बेसिकली नॅशनल जस्टीसमध्ये कुठल्याही मॅटरमध्ये एखादी गोष्ट आपल्याला ऐकुन घेतल्यानंतर निर्णय घेण हे कायदेशीर जास्त ठरत. जर नसेल न्यायतत्वानुसार तर त्याला ऐकुन घेतल पाहिजे. अनफॉरच्युनेटली त्याला परवानगी दिलेली आहे.

**राजेद्र जैन :-**

सामने यह बात आयी है की, जाहिरात ने जो परमिशन दी है तो उसके पास भी प्रॉपर पेपर नहीं है। तो उसको कॅन्सल करने की ऑटोमॅटिक परमिशन सुनावणीका अधिकार भी नहीं है।

**अतिरिक्त आयुक्त :-**

बात ऐसी है की, उसके पास कागज है की नहीं लेकिन परमिशन तो दी गई है। तो वह उसको ........

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, त्यांना जर परवानगी दिली असेल तर परवानगीमध्ये १०० फुटाच मेन्शन केल असेल. त्यांनी त्याच्यापेक्षा आणखीन जास्त जागा ॲक्वायर केल्या असेल तर आपण विदाऊट हेअरींग रद्द करु शकतो. त्या अटीशर्ती त्याला टाकुनच दिल्या असतील ना.

**अतिरिक्त आयुक्त :-**

अटिशर्तीचा भंग केला त्या नार्म्सवर रद्द करता येते. पण त्यासाठी सुनावणी घ्यावी लागेल.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, आपण जे मीटर बिल रिडींग घेतो, तर मीटर बंद असल्यानंतर आपण सरासरी दर लावतो. तो आपल्या संपूर्ण महापालिकेची जी हद्द आहे. त्याला एकच बाब आहे की, अलग-अलग आहेत? जस मिरारोड म्हणा, भाईंदर म्हणा, उत्तन म्हणा, डोंगरी म्हणा अशा वेगळ्या प्रकारात दर आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

या ठिकाणी आपल्याला एव्हरेज बिल लावायचा असेल तर त्या परिसरामध्ये किती पाणी चालते. तुमच एक कनेक्शन बंद असेल. त्याच्या आजूबाजूच्या कनेक्शनला पाणी जाते त्यांचा अंदाज घेऊन लावल जाते.

**बर्नड डिमेलो :-**

तुम्ही असा अंदाज कसा काढणार?

**सुरेश वाकोडे :-**

आमच्याकडे त्या भागाचे रिडींग आहे. मिरारोड मध्ये कस आहे की, तिकडचे काय रिडींग आमच्याकडे आहे, पूनम सागरची काय आहे ती आमच्याकडे असते. पेणकर पाड्याची रिडींग काय आहे ती आमच्याकडे असते. त्याच्या परिसराचे रिडींग असतात ना.

**बर्नड डिमेलो :-**

माझ्या माहितीप्रमाणे आम्ही माहिती काढली. तर राई, मोर्वा, मुर्धा मध्ये ५०० रुपये सरासरी आहे. येताना तुमच रिडींग पाणी कस मोजता ते बघाव लागेल. उत्तनमध्ये ६०० रु. आणि पाली मध्ये १००० रु. सगळ्या लोकांची बिल भरण्यासाठी लाईन लावले आहेत. आणि बिलाच्या रिडींगमध्ये चूका केल्या तर त्या आपण समजून घेऊ. पण दराच्या बाबतीत एवढ का? १००० रु. सरासरी.

**सुरेश वाकोडे :-**

पर्टीक्युलर काय असेल तर मला सांगा. आपण करुन घेऊ.

**बर्नड डिमेलो :-**

उटसुट चुका होतात. लावायच तर समान करा. किंवा काहीतरी करा. रिडींगप्रमाणे जेवढ आपल्याला जाते. तुम्हाला उत्तनच रिडींग मिळते. आता उत्तन पाली हे तुम्ही अलग-अलग कुठून घेता. रिडींग कुठून घेता की, पालीला अमुक एवढ लिटर गेल आणि बाकीच्या सर्व लोकांचे मिटर चालू आहे. एकाच बंद आहे तर त्याला तुम्ही कोणत रिडींग लावता?

**सुरेश वाकोडे :-**

त्याच जवळपासच जे रिडींग असत ते लावल.

**बर्नड डिमेलो :-**

रिडींग नाही. दरच पाहिजे.

**हेलन गोविंद :-**

उत्तनच पण तेवढच आहे. पाली पण जवळपासच आहे ना.

**बर्नड डिमेलो :-**

एकाची गोष्ट नाही. तुम्ही दर लावता ना त्याचा तक्ता आहे काहीतरी. एरिया व्हाईज तक्ता ठेवलेला आहे. ४५०, ६०० आणि १००० रु. तुम्हाला वाटल्यास माहिती असेल तर माहिती द्या.

**अनिता पाटील :-**

वाकोडे साहेब, मला पण विचारायच आहे. स्पेशली पेणकर पाड्यातील नागरीकांना बिल आलेली आहेत. आणि ते भरायला गेले की घेत नाही. कारण, बिलामध्ये चूकी आहे डबल बिल आलेल आहे. कम्प्युटर तुमच ॲक्सेप्ट करत नाही. अशा काही गोष्टी आहेत. तर तुम्ही जरा बघा. बिल अजुन भेटली नाही. भेटल त्यांचे बिल घेत नाही. त्यांना परत रिटर्न पाठवल जाते. बऱ्याचशा कम्प्लेंट माझ्याकडे आल्या. तर काय प्रॉब्लेम आहे ते तुम्ही बघून घ्या.

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त महोदय, आपल्या मिरारोडच जे केंद्र आहे. गेल्या १५ दिवसांपासुन तिथे सिस्टम डाऊन आहे. त्यामुळे पैसे स्विकारत नाही.

**अतिरिक्त आयुक्त :-**

सुरु झाल ते. प्रॉब्लेम झाला होता. तिथे टॉवर पडला होता. सकाळी कमिशनर साहेबांकडे चर्चा झाली. आता चालू झालेल आहे.

**रोहिदास पाटील :-**

१५ दिवसांपूर्वी टॉवर पडला होता की, १० दिवसांपूर्वी. साहेब पाणी खात्याचा विषय अत्यंत गंभीर विषय आहे. मी गेल्या मिटींगमध्ये पण बोललो होतो. त्यांनी सांगितले जानेवारी पर्यंतची बिल दिली. आता फेब्रुवारी, मार्च, एप्रिल पर्यंतची बिल दिली. तर मे, जुन, जुलै, ऑगस्ट परत चार महिने झाले. पहिल्यांदा बिल पाठवल आहे. त्याचे पैसे तुम्ही ॲक्सेप्ट करत नाही. कोणत सॉफ्टवेअर आहे. खरोखर सॉफ्टवेअर चालते की नाही? सॉफ्टवेअर वाल्याच आपण पेमेंट दिल की, पेमेंट बद्दल झगडा आहे?

**मनस्वी म्हात्रे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते, १० दिवसांपूर्वी टॉवर पडला होता. हेड ऑफिसवर लागलेला होता. त्याच्यावर मेन डिवाईज असतो जो इतर वॉर्ड ऑफिसेसला कनेक्ट असतो. तो पडला होता. त्याच्यात दुरुस्ती करुन ................

**रोहिदास पाटील :-**

आजची तारीख ७ आहे. आपण २८ पकडु या. २८ च्या आधी तुमच सॉफ्टवेअर चालु होत का?

**मनस्वी म्हात्रे :-**

हो चालू होत.

**रोहिदास पाटील :-**

मग, चालु होत. तर सेकंड टर्मची बिल इश्यु झाली का?

**मनस्वी म्हात्रे :-**

हो झाली.

**रोहिदास पाटील :-**

कोणती?

**मनस्वी म्हात्रे :-**

प्रापर्टी टॅक्स पण आणि वॉटर मॉडेल पण.

**रोहिदास पाटील :-**

मी पाण्याच म्हणतो. मे, जुन, जुलै, ऑगस्ट तर ऑगस्ट ची बिल काढली का?

**मनस्वी म्हात्रे :-**

नाही. ती बिल बाकी आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुमच सॉफ्टवेअर वर्कींग आहे. सगळी सिस्टम तयार आहे. त्याला फक्त कमांड द्यायची आहे. कमांड द्यायला एक महिना गेला.

**अतिरिक्त आयुक्त :-**

काका, हे लक्षात घ्या. मे, जुन, जुलै, ऑगस्ट आता त्यांनी रिडींग घेऊन बिल वाटप केली. त्यावर ते नंतर रिडींग घेणार. त्याच्यानंतर बिल तयार करतील. त्यानंतर वाटप होईल.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेब, एप्रिलची बिल त्यांनी जुलैमध्ये वाटली. तर रिडींग घेतली की नाही?

**सुरेश वाकोडे :-**

रिडींग घेतली आहे. त्याची बिल जनरेट करुन तयार करतील.

**रोहिदास पाटील :-**

कुठपर्यंत होईल?

**सुरेश वाकोडे :-**

सप्टेंबर पर्यंत ऑगस्टपर्यंत घेतलेली आहे. १५ दिवसांमध्ये बिल तयार होऊन वाटायला सुरुवात होईल.

**बर्नट डिमेलो :-**

दि. १५/०७/२०१३ व दि. २६/०७/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९८ :-**

दि. १५/०७/२०१३ व दि. २६/०७/२०१३ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. (दि. २६/०९/२०१३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ८७)

**ठराव क्र. ८८ :-**

दि. १५/०७/२०१३ व दि. २६/०७/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समित**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, दि. १४/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राजेंद्र जैन :-**

पेज नं. १० पर मेने सवाल पुछा था, उसका जवाब क्लिअर नहीं हुआ। मुझे विधी अधिकारी से जवाब चाहिए। पान नं. १० पर पुछा है की, एक केस में स्टे हो गया है और हटने के बाद में जिसके खिलाफ स्टे हटाया उसको नगररचना में उसको मॉडिफाय करने के ॲप्लीकेशन दिया है। तो क्या वॉर्ड ऑफिसर उस ॲप्लीकेशन के बेसिक पर स्टे हटने के बादमें उसको तोडने से अपने अधिकार को युज कर सकता है रोकने के लिए। स्टे हट गया है। स्टे हटने के बाद में जिसको तोडने का नोटिस दिया वह मालिक है। उसने प्लान मॉडिफाय करने के लिए ॲप्लीकेशन डाला है, तो क्या वॉर्ड ऑफिसर को यह अधिकार है की उस ॲप्लीकेशन के

बेसिस पर उसको तोडने से रोके। जब की आपने उसको तोडने के लिए बोला है की, आप तोड सकते है। वॉर्ड ऑफिसर इस ॲप्लीकेशन का आधार बना सकता है क्या? इसका जवाब चाहिए।

**विधी अधिकारी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते. ऑनरेबल सुप्रिम कोर्टाने एक जजमेंट दिलेल आहे की, एखादी इमारत रेग्युलराईज करुन वाचवता येण्यासारखी असेल आणि ती कायद्यात बसुन रेग्युलराईज होत असेल तर ती करुन घ्यावी.

**राजेंद्र जैन :-**

उसमें उस आधार के उपर कोई भी नगरपालिका ने उसको नोटिस दिया तोडने के लिए। कायदे में अगर बैठता तो नगरपालिका उसको नोटिस नहीं देता। कायदे में बैठने वाली बात थी ...........

**विधी अधिकारी :-**

जरुरी नहीं है।

**राजेंद्र जैन :-**

जरुरी नहीं। लेकिन अभी नोटिस दिया। हमने बोला तोडदे। और तोडने को उसने स्टे लिया। और स्टे हट गया मगर हम इसको तोडना चाहते है यह बात पक्की हुई। अभी नोटिस आ गई, स्टे हट गया। अभी उसने नगररचना में अप्लाय किया की, मैं इसको रेग्युलराईज करना चाहता हुँ। और उस ॲप्लीकेशन के बेसिस पर वॉर्ड ऑफिसर कोई कारवाई नहीं करता है। आपने ही उसको बोला की, आप तोड सकते है। लेकिन उस ॲप्लीकेशन के बेसिस पर साल देढ साल, २ साल कब तक आप उसको रुकने दे सकते है। अधिकार युज करना जायज है, या नाजायज है। मुझे इसका जवाब चाहिए।

**विधी अधिकारी :-**

कायद्यामध्ये एम.आर.टी.पी. ॲक्ट मध्ये, रेग्युलराईजेशनच्या ६० दिवसांमध्ये अर्ज डिसाईड होऊन निर्णय होतो.

**राजेंद्र जैन :-**

६० दिन तक वॉर्ड ऑफिसर रुक सकता है। उसे ज्यादा रुका हो तो?

**विधी अधिकारी :-**

सर, केस टु केस .................

**राजेंद्र जैन :-**

मॅडम, हम यह पुछ रहे है की, इसमे क्या हुआ अगर स्टे हट गया और उसने उसपर ॲप्लीकेशन डाल दिया। की, में नगररचना में मॉडिफाय करने के लिए डाला है ना नगररचना वहाँ पर गया ७ दिन के अंदर ना यह हा करेंगे ना करेंगे। अल्टीमेटली कायदे में ना करे दिया लेकिन टाईम हो चला और जब तक पेंडींग पडा है।

**विधी अधिकारी :-**

सर, कोर्ट तोड दो ऐसे नहीं बोलती। उनकी जो प्रेयर होती है, वह रिजेक्ट होती है।

**राजेंद्र जैन :-**

मतलब आपने पहला तोडना चाहा था। वॉर्ड ऑफिसर आपसे राय लेके रुका है या नही? यह डिसीजन वॉर्ड ऑफिसर लेने का अधिकार है या विधी अधिकारी को लेने का अधिकार है।

**विधी अधिकारी :-**

सर, वॉर्ड ऑफिसर को लेने का अधिकार है ना।

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, तुमच हे निवेदन म्हणन फार धोकादायक ठरेल. आज इथे बसलेले सगळे वॉर्ड ऑफिसर तुम्हाला विचारणार पण नाही. महापालिकेला पण विचारणार नाही, आयुक्तांना पण नाही आणि सभापतींना पण विचारणार नाही. आणि महापौरांना पण विचारणार नाही अस होत नाही. त्यांना वेळोवेळी तुमच डायरेक्शन माहित असेल. पण सुप्रिम कोर्टात असा जर निर्णय झाला असेल जर ॲप्लीकेशन आले त्याची कॉपी ह्यांच्याकडे दिले असेल. तर त्यांनी तुमच मत मागण हे गरजेच आहे. त्यांना अधिकार नाही. हे तुम्हाला निट रेकॉर्डींग होईल अस सांगायला लागेल. तुम्ही केलेल निवेदन चूकीच आहे.

**विधी अधिकारी :-**

साहेबांच जे म्हणन आहे त्याच कुठल प्रकरण आहे ते आम्हाला माहित नाही. पण, मी सुप्रिम कोर्टाचा निर्णय जो म्हटला आहे तो ह्या संबंधाशी रिलेटेड नाही. हा एक धोरणात्मक निर्णय आहे.

**राजेंद्र जैन :-**

मॅडम मैने आपको यह पुछा है की, वॉर्ड ऑफिसर ने यह बोला की, इनको तोड दिया जाए क्या? इनका आन्सर आया की हा तोड सकते है। उसके बाद में उस अधिकार को युज कर रहे है। इसने ऐसा किया हुआ है। अगर वहाँ से आ जाता था तो भी नहीं तोडना या अगर आगया तभी भी नहीं तोडना है। रिवाईज किया गया है। अभी तुरंत बोल दिया की, रिवाईज नहीं हो सकता फिर भी नहीं तुटा है। तोडना ही नहीं तो क्या करेंगे।

**मुन्ना सिंह :-**

मा. सभापती साहब, डॉक्टर साहब कौनसा विषय बोल रहे है मुझे मालुम नहीं। लेकिन एक बिल्डींग है, इंद्रलोक में गटर को लगके बनाई थी। तो बिल्डींग तुटी थी जब गिर गई थी तब उसमें नगरपालिका के कर्मचारी भी मर गए थे। और प्रायव्हेट कॉन्ट्रॅक्टर के आदमी भी मरे थे। अब बिल्डींग वापस तयार हुई। उसमें हॉस्पीटल भी खुल गया। ऐसे-ऐसे काम मिरा भाईंदर में हुए है।

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये रस्ता दुरुस्तीच आणि एम.एम.आर.डी.ए. च कार्यालय बद्दल आयुक्त साहेब आपण बोलले होते. त्याचा काहीतरी पाठपुरावा केला का? एम.एम.आर.डी.ए. च कार्यालय आपल्या पालिकेत आठवड्यात एकदा किंवा दोनदा इथे असाव आणि रस्ता रिपेअरींगच मला वाटते २-३ दिवस पाऊस थांबला होता. काल-आज पुन्हा पाऊस पडला तर कधीपर्यंत होईल. खडी किंवा डांबर बारिक टाकले आहेत. तर दुरुस्तीच काम कधीपासुन होईल?

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, साहेब काम रोजचीच चालू आहेत.

**बर्नड डिमेलो :-**

तुम्ही डांबराची लेयर टाकली नाही.

**दिपक खांबित :-**

पाऊस पडतो म्हणुन टाकल नाही. छोटे-मोठे खड्डे आहेत ते डांबरानेच बुजवतो. पण मेन रस्ते घेतले ते ग्राऊंटींगने करायचे.

**बर्नड डिमेलो :-**

दि. १४/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९९ :-**

दि. १४/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८९ :-**

दि. १४/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समित**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १००, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २०(४) अन्वये स्थायी समितीच्या निम्मे (आठ) सदस्यांची निवृत्तीकरीता चिठ्ठ्या टाकून निवृत्त करणेबाबत. मी सर्व चिठ्ठयांवर सदस्यांची नावे लिहीली आहेत. ह्या चिठ्ठया डब्ब्यात टाकल्या जातील. त्यातुन ८ चिठ्ठया काढण्यात येईल ते सदस्य निवृत्त होतील. ८ चिठ्ठया बर्नड डिमेलो काढत आहेत. ८ चिठ्ठया काढल्या आहेत. ती नावे मी घोषित करतो. कोणाच्या चिठ्ठया निघाल्या आहेत ते आपण रेकॉर्डींग करुन घ्यायच आहे. १) श्री. बर्नड डिमेलो २) श्री. राजेश वेतोसकर ३) श्री. प्रमोद सामंत ४) श्रीम. हेलन गोविंद ५) श्री. संदिप पाटील ६) श्री. प्रविण पाटील ७) डॉ. रमेश जैन ८) डॉ. राजेंद्र जैन अशा ८ सदस्यांची नावे निघालेली आहेत. बाकी राहिलेली ८ सदस्यांनी नावे वाचून सांगतो. १) श्री. राजु भोईर २) श्रीम. अनिता पाटील ३) श्री. मुन्ना सिंह ४) श्रीम. शर्मिला बगाजी ५) श्री. रोहिदास पाटील ६) श्री. शरद पाटील ७) श्रीम. मिरादेवी यादव ८) श्री. प्रशांत दळवी असे सदस्य राहिलेले आहेत. ह्या ८ सदस्यांची अजुन एक वर्षाची मुदत आहे.

**मा. सभापती :-**

निवृत्त झालेल्या सदस्यांची नावे १) श्री. बर्नड डिमेलो २) श्री. राजेश वेतोसकर ३) श्री. प्रमोद सामंत ४) श्रीम. हेलन गोविंद ५) श्री. संदिप पाटील ६) श्री. प्रविण पाटील ७) डॉ. रमेश जैन ८) डॉ. राजेंद्र जैन

**(चिठ्ठ्या टाकून आठ सदस्य निवृत्त करणेत आले.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०१, त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (दि. १ एप्रिल २०१३ ते दि. ३० जुन २०१३) (दि. २८/०८/२०१३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७३)

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती महोदय, कर विभाग फक्त ५ टक्के जमा झालेली आहे. तर बाकीचे ९५ टक्के कसे जमा होणार?

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, ही जी वसुली आहे ती नविन बील निघायच्या अगोदरची वसुली आहे. चालु वर्षाची बिल काढण्याची जी प्रक्रिया होती. ते दोन टप्प्यामध्ये करण्यात येत आहे. जवळ-जवळ २ लाख ४० हजार बिल जनरेट झालेली आहे. त्यापैकी १ लाख ३० हजार बिल प्रिंट झालेली आहेत. बाकीची बिल छापण्यासाठी दिलेली आहेत. उर्वरित फक्त उत्तन, घोडबंदर आणि मिरा या ठिकाणी पूर्वी कम्प्युटरायजेशन नव्हत. तिथली बिल चेक करुन आम्ही काढत आहोत. सामंत साहेबांनी विचारल्या प्रमाणे आता सर्व बिल विभागीय कार्यालयात दिलेली आहेत. वाटप झाल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीमध्ये संपूर्ण वसुली होईल.

**रोहिदास पाटील :-**

बिलांची प्रिंट आपण इथुन काढतो की बाहेरुन काढुन आणतो?

**दिपक सावंत :-**

बिल प्रिंट आपण बाहेरुन आणतो.

**रोहिदास पाटील :-**

आपली काही व्यवस्था नाही.

**दिपक सावंत :-**

नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्याचा ताळेबंद केल का केल तेवढा खर्च वाचतो किंवा जास्त होतो. म्हणजे दुसऱ्यावर आपण डिपेंड राहतो. आपल्याच महापालिकेची प्रिटींग व्यवस्था बिलाची कशी होते. तुमच बिल कस प्रिंट होते?

**दिपक सावंत :-**

हे जरी केल तरी आपल्याला लागणारी स्टेशनरी हा सर्व जो खर्च आहे आणि आपल्याला लागणारा वेळ, झेरॉक्स मशिन आहे किंवा प्रिटींगच्या मशिन आहेत. त्या छोट्या आहेत. तिथे एका दिवसात ५०,००० ते ७५,००० बिल प्रिंट आऊट येतात.

**प्रमोद सामंत :-**

आपल्याकडे किती बिल प्रिंट होतात. आता तुम्ही जी संख्या सांगितली ती कुठली सांगितली? घोडबंदर आणि मिरामध्ये हातानी जी बिल बनवायची ती पोचली की नाही ?

**दिपक सावंत :-**

घोडबंदर उत्तन आणि मिरा ह्या ठिकाणी लास्ट इयर कॉम्प्यूटरायझेशन नव्हते हातानी काढली होती. ह्यावर्षी आपण कम्प्यूटरायझेशन केल. तर ती बिल थकवण्यामध्ये पावती पुस्तक आहेत ते खपवल्या नव्हत्या. त्यामुळे आम्ही चेक करून बिल काढायच ठरवल. त्यामुळे थांबवल आहे. एक एक एरिया....................

**प्रमोद सामंत :-**

आता जी उरलेली बिल आहेत १ लाख ३० हजार नविन बिल बनायची आहेत.

**दिपक सावंत :-**

नाही. झालेली आहेत.

**प्रमोद सामंत :-**

जनरेट झाली नाही. २ लाख ४० हजार बिल जनरेट झाली नाही असे तुम्ही सांगितल.

**दिपक सावंत :-**

१ लाख ३० हजार बिल जनरेट झालेली आहेत.

**प्रमोद सामंत :-**

टोटल प्रॉपर्टीची बिल किती आहेत ?

**दिपक सावंत :-**

२ लाख ९२ हजार आहेत.

**प्रमोद सामंत :-**

ती प्रिंट काढुन कधीपर्यत होणार ?

**दिपक सावंत :-**

राहिलेले प्रिंट ह्या आठवड्यामध्ये काढुन घेवू सध्या कर्मचारी जनगणनेला गेले आहेत. पण ह्या आठवडयात प्रिंट काढू.

**प्रमोद सामंत :-**

टॅक्स विभागाची लोक जनगणनेला पाठवू नका हे डेफिशिएट असेल तर.

**दिपक सावंत :-**

ह्या आठवड्यामध्ये करुन घेतो.

**प्रमोद सामंत :-**

पोचणार कधी?

**दिपक सावंत :-**

वाटप चालु केलेल आहे ना. मिरारोड वैगेरे इथे दिलेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

ह्या वर्षीचा टॅक्स ह्या वर्षी येणार की, पुढच्या वर्षी येणार?

**दिपक सावंत :-**

१५ दिवसांच्या आत सर्वांना बिल पोचतील.

**प्रमोद सामंत :-**

कारण, आता पर्यंत ५ टक्के फक्त ह्याच्यात दिसते.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, तुम्ही २ लाख ९२ हजार हा आकडा सांगितला तर हा कधीपर्यंतचा तुम्ही आकडा सांगता?

**दिपक सावंत :-**

ह्या वर्षाच आहे.

**प्रमोद सामंत :-**

आपल्याकडे डिमांड रजिस्टर नाही.

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. डिमांड रजिस्टर छापण्यासाठी तो नमुना होता तो चेक करुन दिला होता. आणि जे कन्स्लटंट होते त्यांनी ते डिमांड रजिस्टर सॉफ्ट कॉपी मध्ये प्रिंट काढुन देणार.

**प्रमोद सामंत :-**

आपल्याकडे किती टॅक्स ॲक्चुअल झाला पाहिजे त्याची कुठे मोजणी नाही. तर त्याबद्दल सविस्तर माहिती द्याना.

**दिपक सावंत :-**

डिमांड रजिस्टर ह्यावर्षीच आहे. तर डिमांड रजिस्टरच्या बाबतीत असेसमेंट डिमांड रजिस्टर काढण्यासाठी जे कन्स्लटंट आहे. संगणक विभागाला पत्र दिल होत त्यांनी त्या कन्स्लटंटला सांगितलेल आहे. त्याची सॉफ्ट कॉपी आहे फक्त ती प्रिंट करायची बाकी आहे.

**प्रमोद सामंत :-**

त्याला किती वर्ष लागणार. माझा विषय झाला होता की रि-असेसमेंट करायची म्हणुन आपल्याकडे प्रॉपर असेसमेंट नाही. सर्व्हे करायच आणि रि-असेसमेंट करायच त्याबद्दल काय झाल?

**दिपक सावंत :-**

ह्या वर्षीचा जो सर्व्हे केलेला आहे त्याचा रिपोर्ट केलेला आहे. मी नेक्स्ट मिटींगमध्ये देतो.

**रोहिदास पाटील :-**

अमुख खाती कमी करायची होती. अमुख खाती वाढवायची होती. जी डेड झाली त्यांना आपण काढुन टाकायच होत. ज्यांच अस म्हणन होत की, आम्हाला टॅक्स येतच नाही. त्यांना तो टॅक्स लावून घ्यायचा होता. तर ह्याच्यात काही प्रगती झाली की नाही?

**दिपक सावंत :-**

निर्लिखित करायचा जो विषय आहे. ५-६ वर्षापासुनचा तर त्या निर्लिखितच परत परत सर्व जे लिपिक आहेत त्यांना प्रत प्रस्ताव करायला सांगितलेला आहे नव्याने. पूर्वीचा जो केला होता त्याला मंजुरी मिळाली नाही. तसाच तो पेंडींग होता. तर ह्या वर्षी परत तो प्रस्ताव स्टँडींगमध्ये ठेवण्यात येणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

सावंत साहेब, १०० ॲप्लीकेशन आहेत की, जे निर्लिखित करायचे आहे. त्यातले १०,२०,३० ही वादग्रस्त होवू शकते. पण ७० जरी क्लिअर असेल तो पण का तुम्ही बोजा वाढवता? त्याने तुमच बजेट फेल होत. कारण, ती फिगर जी आहे ती आपण सगळी जमेची पकडतो. आणि समोरची पार्टी म्हणते भरण लागुच नाही. त्याच्यावर व्याज वाढव हे वाढव ते वाढव तुमचा जो प्रिंटच आहे ते कॉम्प्युटर प्रोग्रॉमर आहे ना. त्याची किंमत वाढतच जाते. मग, त्याच्यावर अस तुम्ही का प्रयत्न केला की, ही तुम्ही पाठवली होती आणि त्यांनी नाकारली अस होत नाही. प्रस्ताव मंजुरीला पाठवल्याबद्दल तक्रार नाही. इतक्या वर्षी हा विषय चाललेला आहे. त्यातला एक ही खात तुम्ही बंद करु शकले नाही. समजा, १०० पैकी माझे खाते आहे. त्यातले माझ वादग्रस्त आहे. तर मला बाजुला ठेवा ना. ह्याच खात किंवा नाही आहे. तुमची खात्री पटली की नाहीच आहे. तर हे कमी करायला पाहिजे ना. जर कुठे भांडण आहे आपल मत वेगळ आहे. ॲप्लीकान्टचे मत वेगळ आहे तर विषय वेगळा आहे. जे क्लिअर कट आहे हे

तरी कमी व्हायला पाहिजे होत. १०० पैकी ५० टक्के, १०० पैकी ६० टक्के तरी काम व्हायला पाहिजे होत. गेल्यावर्षी पण हेच निवेदन त्याच्या दोन वर्ष आधी हेच निवेदन.

**प्रमोद सामंत :-**

बाजार लिलावाच काय झाल? त्यांचा दुसरा ठेका पण परत संपला.

**राजेंद्र जैन :-**

उसमें मेरे को आवश्वासन स्थायी समिती में, मा. महासभा में जो आयुक्त साहब ने आश्वासन दिए थे। आपसे रस्ते रस्ते में १० बार मुलाकात हुई थी। आपने बोला था की ८-१० दिन में करता हुँ। अभी में परिवहन में बिजी हूँ। यह बहुत अच्छा डिस्कशन हुआ था ऑन पेपर आपने बोला था की, १६ करोड का ओ.एल.टी. (ओपन लॅन्ड टॅक्स) बाकी है। बाद में बढाके १८ करोड किया। बाद में आपने बोला रिकवरी एक करोड किया। उसको जो साहब बोलते है वैसे डिमांड उसमें हे नहीं। कानुन के हिसाब से आपको उदाहरण दिया था की, आपको स्थायी समिती के पास जाना चाहिए। ऑब्जेक्शन माँगना चाहिए। उसका पुरा डिमांडडेशन निकालना चाहिए। आपको मालुम होना चाहिए की कितना रिकवरी होता है। वह बोले में करता हूँ करता हूँ। साहब बोले सर्व्हे नही करेंगे कॉम्प्युटराईज करेंगे। सर्व्हे वाला काम कब करेंगे? कुछ भी तो आपने नहीं किया।

**दिपक सावंत :-**

सर्व्हे किया ना।

**राजेंद्र जैन :-**

आपका पुरा सर्व्हे हो गया? उसके बाद आपने ऑब्जेक्शन सजेशन का ॲड निकाल दिया? आपका बी.पी.एम.सी. ॲक्ट क्या बोलता है की, आप सर्व्हे करने के बाद अखबार में ॲड निकाले १५ दिन का ऑब्जेक्शन माँग ले। यह पहले पब्लिश करेंगे। पब्लिश करने के बाद ऑब्जेक्शन सजेशन माँगेगे। किसका ज्यादा है कम है उसके उपर ऑब्जेक्शन आएगा। उसको डायरेक्ट मंजुरी देगे। फिर वह डिमांड ऑथस्टीक बनता है ना। आप फिर कब काम करेंगे? आज ५-१० साल हो गये। हर ५ साल मे इसको रिव्हाईज करना चाहीए।

**दिपक सावंत :-**

आपका बराबर है। उन्होंने आठ दिन का टाईम मांगा है प्रिंट आऊट करके देने के लिए।

**प्रमोद सामंत :-**

आम्ही हा आता विषय घेतल्यानंतर सांगतात की, आठ दिवसाचा वेळ घेतला तर आतापर्यंत काय करतात? आता का तुम्ही ८ दिवसाचा वेळ घेता? तुम्ही टॅक्स विभागाचा कारभार सांभाळून २-३ वर्षे झाली.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, पहले मै चाहता हूँ की, ऑडीटर इसमे अपना रिपोर्ट थे उनका इसपर क्या रिडींग है।

**भागवत मुरकुटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, डिसेंबर नंतर ११-१२ चं जे लेखा परिक्षण केलं त्या लेखा परिक्षणामध्ये आम्हाला आकारणी पुस्तक देण्यात आलेली नाही. आकारणी पुस्तकामुळे आपल्याला मिरा भाईंदर कार्यक्षेत्रामध्ये किती मालमत्ता किती जमिनी आहेत? कर देण्यास प्रथम जबाबदार नागरीक कोण?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आकारणी पुस्तिका मिली नही है। उसका क्लीअर मतलब हो रहा है की, यह जो १८ करोड बोल रहे है उसका कल १०८ करोड भी हो सकता है। इसकी जिम्मेदारी किसके उपर है?

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, आपलं बजेट ज्यावेळी फायनल केलं होत त्यावेळीच आपण सांगितलेलं.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपके पास जो तज्ञ थे उसे कितना महानगरपालिका का कितना नुकसान हो सकता है उसका बारे ये बताईए ना।

**भागवत मुरकुटे :-**

आकारणी पुस्तक नाही त्यामुळे आम्हाला एक्झॅक्ट सांगता येणार नाही.

**प्रमोद सामंत :-**

आकारणी पुस्तक तुम्हाला मिळाली नाही की नाही आहेत?

**भागवत मुरकुटे :-**

आम्हाला लेखा परिक्षकाने दिलीच नाही त्यावर आम्ही ह्या निष्कर्षावर आलो की, आकारणी पुस्तक अद्यावत करुन ठेवलेली नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, मेरे ख्याल से अगर बीपीएमसी ॲक्ट यह बोलता है की ५ साल से आपका जो ऑथेन्टीक डिमांड रजिस्टर प्रॉपर्टी टॅक्स रजिस्टर होना चाहीए जो आपने नही कराए। तो आप पर भी कुछ उल्लंघन का आरोप बनता है ना आपकी जो धारा बोलतो ५०, १५१ जो बोलती है उसमे आपको जिम्मेदारी दि गई है की, आप ऐसा फॉरमॅट लायेंगे। उसको पास करायेंगे, अप्रुव्ह करेंगे लेकीन आप तो हवा मे यह सब काम किए जा रहे है। मा. महासभा मे डाला था तभी आपने बोला १ करोड वसुल हुआ। क्यो १-२ महिने मे वसुल हुआ। पहले क्यो नही

हुआ? मतलब कही ना कही बहोत बडे लॅपसेस है। इनको पॅनल्टी लगेगी, इंटरेस्ट मिलेगा तो आपने हा बोला जब की आपका डिपार्टमेंट हा बोला। जब की आपका डिपार्टमेंट बोलता है की एक साल पहले इंटरेस्ट नही ले सकते आपने लिखित की दिया नही। अगर किसी बिल्डर का ओपन लॅन्ड टॅक्स ३ करोड बाकी है और १० साल से बाकी है तो उसको पॅनल्टी कितना लगायेंगे उसका तो जवाब दिजिए।

**दिपक सावंत :-**

पॅनल्टीं लगानेका जो आप बोलते है पॅनल्टी कभी लगती है जब असेसमेंट लगने के बाद...........

**डॉ. राजेंद्र जैन :-**

असेसमेंट आपने किया नही है ना तो हम लोग भुगते है ना। इंटरेस्ट भी लगेगा क्या?

**दिपक सावंत :-**

मै इंटरेस्ट का ही बता रहा हूँ। जब असेसमेंट होने के बाद १५ दिन का हम नोटीस देते है उसके बाद साल पुरा होने के बाद इंटरेस्ट चालू होता है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

कितनी प्रॉपर्टी आपके असेसमेंट हिस्से मे नही है। जब आयेंगी तब आप निकालेंगे तो क्या करेंगे उसका? आयुक्त महोदय आश्वासन दे चुके है एक महिने मे करते है।

**दिपक सावंत :-**

ह्याच्यामध्ये जी ओपन लॅन्ड टॅक्स ची जी वसुली आहे.........

**डॉ. राजेंद्र जैन :-**

ओपन लॅन्ड टॅक्स रिकव्हरी ईज वन ऑफ द पार्ट ऑफ रिकव्हरी यु आर रिस्पॉन्सीबल फॉर दिस रिकव्हरी.

**दिपक सावंत :-**

सर, आय एम रिस्पॉन्सीबल फॉर ऑल टॅक्सेस रिकव्हरी बट, हाऊ टु इनपुट ओपन लॅन्ड टॅक्स ईज अबाऊट फर्स्ट थिंग फॉर्म सीसी टू ओसी व्हॉटएव्हर द..........

**प्रमोद सामंत :-**

म्हणजे तुम्हाला सी.सी. दिलेली. मी मागे आयुक्तांकडे एक पत्र दिलेलं सी.सी. दिलेलं. आम्ही या या पर्टीक्युलर सर्व्हे नंबर मध्ये ह्या इमारतीला सी.सी. दिलेली आहे त्याचं तुमच्याकडे पत्र व्यवहार होतो का?

**दिपक सावंत :-**

नाही होतं.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अभी क्यो नही हो रहा है। तब तो आप बोल रहे थे की पहले नही होता था लेकीन अभी हो रहा है।

**दिपक सावंत :-**

दोन कंन्फ्युजन आहे. ह्याच्यामध्ये सीसी टू ओ.सी. आहेत त्या २००० पासून सीसी दिलेल्या आहेत त्याचा त्यांनी सगळा रेकॉर्ड आम्हाला दिलेला आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अभि दिया पहले आपके पास नही था।

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही काय केले त्याचं २००० पासुनचा रेकॉर्ड तुम्हाला कधी मिळाला?

**दिपक सावंत :-**

दिड महिन्यापूर्वी मिळाला.

**प्रमोद सामंत :-**

दिड महिन्यापुर्वीचा मिळाला २००० साली ज्याचं सी.सी. दिलेले आहे त्याचं आपण २००७ मध्ये त्यांनी ७ वर्षे लावली बिल्डींग बनवायला ओसी घ्यायला ७ वर्षाच्या टॅक्स आपला लॅप्स झाला.

**दिपक सावंत :-**

हा आपेन लॅप्स टॅक्स ओपन २००८ पासुन चालू झाला.

**प्रमोद सामंत :-**

२००८ ची बिल्डींग २००९ ला पूर्ण होते. वर्षेभर लोकं बिल्डींग पूर्ण करतात. आता तो ज्यांनी डिफरन्स आहे ओपन लॅप्स टॅक्सचा तो कसा काय वसुल करणार तुम्ही?

**दिपक सावंत :-**

ते सांगतो तुम्हाला ज्यावेळेस हा ॲक्टनुसार झाला त्यावेळेस नगररचना विभागाकडून टॅक्स विभागाला प्रत्येक वर्षाची सीसी दिलेली आहे त्याची माहिती दिलेली आहे. त्या आधारावरुन टॅक्स विभागाने कर आकारणी केली आहे.

**प्रमोद सामंत :-**

तुम्हाला ते दिड महिन्यापूर्वी मिळाले ना.

**दिपक सावंत :-**

हे पूर्वीपासुन आम्ही घेतले आहे. साहेबांना महासभेत प्रश्न विचारला आणि कमिश्नर साहेबांनी सांगितले की, २००० पासूनची घ्या. एखाद्या बिल्डींगला ओसी २०१० मध्ये दिली असू शकते हे प्रत्येक गोष्ट चेक करा त्याच्यामुळे संपूर्ण २००० पासून घेतले आहे. जवळ जवळ १००० सीसी असतील प्रत्येक सीसी मध्ये ओसी दिलेली ओसी घेतलेली नसेल त्याच टॅक्सेशन पण चालु झालं प्रत्येक गोष्ट आम्ही चेक करत आहोत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

ये ऐसा हो रहा है ये जो लिस्ट तयार कर रहे है उसका विश्वास करना पड रहा है और ये अंतिम सत्य है डिमांड रजिस्टर और प्रॉपर्टी रजिस्टर होना चाहीए था उसके हिसाब से चेक कर सकते थे अभी क्रॉस रेफीकेशन कैसे करेंगे ये बोले वही ठिक है उसको कैसे पकडेंगे उसका नाम लिस्ट मे नही है चोरी करने उसको कैसे पकडेगे।

**दिपक सावंत :-**

डॉक्टर साहेब सीसी दिलेले आहेत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

डिमांड रजिस्टर बनाना आपका फर्ज था।

**दिपक सावंत :-**

डिमांड रजिस्टर ओपन लाईन का बनाया है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सर्व्हे करके बनाया।

**दिपक सावंत :-**

सर्व्हे करके नही बनाया जो सीसी है उसके उपर से बनाऐंगे।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

बाकी टॅक्सेस का?

**दिपक सावंत :-**

बाकी टॅक्सेस का भी बनाया है सॉफ्ट कॉपी है हार्ड कॉपी उसको आठ दिनमे उन्होंने प्रिंट आऊट देने को बोला है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

फायनल कर ली अपने।

**दिपक सावंत :-**

नही आपके सामने आयेगा ना हम जब बनायेंगे

**डॉ. राजेंद्र जैन :-**

कब आयेगा?

**दिपक सावंत :-**

आठ दिन बाद देने के बाद १५ दिन के बाद आयेगा।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

१५ दिन मे फायनल करके आयेगा उसके पहले तो आप बाहर नोटीस दे दो ना उसको सजेशन ऑब्जेक्शन।

**दिपक सावंत :-**

सजेशन ऑब्जेक्शन बाद मे जाऐंगे आपको जो फॉर्मेट अप्रुवल करके आपसे लेंगे।

**प्रमोद सामंत :-**

फॉरमॅट अप्रूव्ह कशाला? फॉरमॅटचं तुम्ही कधी ही देऊ शकता डिले कर करता तुम्ही?

**दिपक सावंत :-**

बनवलेलं आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. आयुक्त साहेब, कसं आहे की, हे जाणून बुजुन डिले केला जातो. आमचा आरोप आहे फॉरमॅट ला त्यांना अप्रुवल द्यायला वेळ लागत नाही. प्रिंटींग ला गेलं पाहिजे तिथून आलं पाहिजे. मग ८-१५ दिवसाने देणार हा विषय नाही फॉरमॅट तुम्हाला अगोदरचं घेतलं पाहिजे ना मग तुम्ही त्यांना बाकीचं असेसमेंट करणार ना?

**मा. सभापती :-**

हा विषय आपण पुढच्या मिटींगमध्ये घेऊ.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही बोलता पण कुठलेच विषय पुढच्या मिटींगला येत नाही तर त्यामुळे आता काय ते स्पष्ट करा की, काय होणार आणि नाही झालं तर ह्यांच्यावर काय कारवाई करायची ते आम्हाला क्लीअर करा.

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, आता बोलतात की फॉरमॅट सॅन्शनसाठी येईल आता फॉरमॅट मध्ये दुरुस्ती सुचवली तर अजून वेळ लागेल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सीएसी बहोत फेमस हो गया। सीएसी का मतलब सेंट्रल ऑडीट कमिटी कोई यह काम करती है रिपोर्ट देती है अपने यहाँ जो ऑडीट रिपोर्ट बनाया है वह रिपोर्ट को आकलन करके उसपे आप काम करेंगे तो आपको मालुम पडेगा की, उस डिपार्टमेंट मे कितना बडा नुकसान हो रहा है।

**प्रमोद सामंत :-**

आपण गेल्या मिटींगला म्हणजे २८ तारखेला ठरवलेलं की ऑडीट विभागाला स्टाफ द्यायचा आज ७ तारीख आली अजून ऑडीट विभागाला स्टाफ दिला नाही अजून प्रपोजल इकडे तिकडे फिरत आहे. प्रशासनाचं काय चाललं आहे ते मला कळतचं नाही मी मागे हे पण बोललो होतो की इंटरनल डिपार्टमेंट जे काम आहे ते सुरळीत झालं पाहिजे पण ते होतच नाही. वर्षानुवर्षे ऑडीट रिपोर्ट येत नाही कारण त्यांच्याकडे स्टाफ नाही. त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. मी विचारल का नाही. होत तर माहिती पोहचत नाही. आता पण ते सांगतात की, त्यांच्यापर्यंत आकारणी पुस्तक पोहोचलीच नाही. कसे काय ऑडीट रिपोर्ट ते देणार? अजुन त्यांना स्टाफ नाही मिळाला.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदयजी ने भी आपसे बोला था की, जो बसेस है। फ्लाय ओव्हर के पास में तुटी फुटी जले बसे कैसी भी कंडीशन है। बसेस की हालत बहुत बेकार है। नई की नई बसेस कॉन्ट्रॅक्टर को देते है। वह क्या मालुम क्या करते है। वहाँ पर तुटी फुटी बसेस पडी है। हमने बोला था निरिक्षण की दौरा निकालेंगे। ना आपने दौरा का डेट दिया ना इन्होंने दिया।

**प्रमोद सामंत :-**

साहेब मला उत्तर मिळाल नाही.

**शरद पाटील :-**

आम्हाला कधी कळवल नाही.

**दिपक सावंत :-**

आठ दिवसात आल की कळवतो.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही फॉरमॅटला मंजुरी का घेत नाही?

**राजेंद्र जैन :-**

फॉरमॅट तो आपको निकालने का है। और फॉरमॅट तो पहले बना रहता है। यहाँ का नहीं बनाया तो ठाणे का मिलेगा, भिवंडी का मिलेगा।

**दिपक सावंत :-**

जुना बनवलेला आहे. त्याच्यातच करेक्शन करुन बनवलेला आहे. तर आठ दिवसात देतो.

**प्रमोद सामंत :-**

मा. आयुक्त साहेब, असच उत्तर दिल जाते. परिवहनच आम्हाला नेहमी सांगतात की, १०० बसेस देणार आहेत, १०० बसेसची मंजुरी मिळाले. पण त्या बसेस ठेवायला डेपोच काय केल ते सांगा?

**अतिरिक्त आयुक्त :-**

केंद्र शासनाचा जे.एन.एन.यु.आर.एम. स्किम आहे. तिथे आपला प्रस्ताव गेला होता. त्यामध्ये आजच सकाळी आपल्या मा. महापौर मॅडम ने पत्रकार परिषद घेऊन प्रसिध्दीपत्रक पण दिलेल आहे. त्या अनुषंगाने आपल्याला फॉरच्युनेटली आतापर्यंत कस होत की, ५० टक्के केंद्र शासन द्यायचे. ३० टक्के राज्य शासन द्यायचे, २० टक्के आपण देतो. असा म्हणुन १०० बसेसचा प्रस्ताव आहे. तर २० टक्के कान्स्ट्रुब्युशन केंद्र सरकारने द्याव. असा आपण प्रस्ताव केंद्र शासनाला दिला होता आणि आपल्याला सांगायला मला आनंद वाटतो की, तो आपला प्रस्ताव फक्त महानगरपालिकेपुर्ताच मंजुर झाला. आणि ८० टक्के केंद्र शासनाने पैसे भरायचे मान्य केले. आणि २० टक्के राज्य सरकार. त्यामुळे आपल्यावर कुठलाही बोजा पडलेला नाही. जर बसेससाठी ३०-३५ लाखाचा प्रस्ताव मंजुर झाला. ह्यापूर्वी डेपो वैगेरे ज्या गोष्टी असायच्या ह्यासाठी पैसे मिळत नव्हते. ह्यावेळेस त्याच्यासाठी वेगळे ६ कोटी रुपये आपल्याला मिळालेले आहेत. अशा पध्दतीने आपल्याला १०० बसेससाठी मदत मिळालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, प्रश्न असा असतो की, आपण सगळ्यांनी ह्या प्रस्तावाच अभिनंदन करायला काही हरकत नाही. आता तो निधी मंजुर झाला बोलता त्यांनी प्रश्न विचारला की, डेपोच कुठे लोकेशन ठरल?

**अतिरिक्त आयुक्त :-**

त्या अनुषंगाने एस.टी. बरोबर पण आपल बोलण चाललेल आहे. एस.टी.ची जागा आपल्याला मिळते का हा एक प्रयत्न आहे. आणखीन काही शासकीय जागा त्यासाठी पण प्रयत्न चालू आहे. ३-४ प्रस्ताव आहे. त्या

अनुषंगाने त्याशिवाय पर्याय नाही. कारण, रस्त्यात सद्यस्थितीत गाड्या ठेवतो ती संयुक्तीक होणार नाही. त्या अनुषंगाने डेपोसाठी आपल्याला तयारी करायची चालली आहे.

**रोहिदास पाटील :-**

अस बोलण्यापेक्षा जस तुम्ही बोलले एस.टी. च एक आहे. आरक्षण क्रमांक हे आहे, ते आहे. १,२,३,४ अस काही सांगा ना.

**सत्यवान धनेगावे :-**

मौजे घोडबंदर सर्व्हे नं. २३३ ही शासकीय जागा आहे.

**रोहिदास पाटील :-**

२३३ वर आजच्या घटकेला किती लोकांच ॲप्लीकेशन वर किती लोकांना मंजुर केलेल आहे. २३३ मला माहित आहे. २३३ ची जागा आजच्या घटकेला तुमच्या रेकॉर्डवर काय-काय आहे कोणाकोणाला अलॉटमेंट झाल.

**सत्यवान धनेगावे :-**

ती जागा अलॉटमेंट करुन शिल्लक असलेली ४ हजार ५०० स्क्वेअर मीटर जागा सद्यस्थितीत शिल्लक आहे. शिल्लक असलेली जागा मागितलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

दिली किती? कोणाकोणाला दिली आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

डिस्ट्रीक्ट कोर्टाला दिलेली आहे. त्यानंतर एस.टी.पी. प्लानसाठी दिलेली आहे. बाकी काही रिझर्व्हेशन आहे, सी.आर.झेड आहेत.

**रोहिदास पाटील :-**

पोलिसांना.

**सत्यवान धनेगावे :-**

पोलिसांना दिलेली नाही.

**रोहिदास पाटील :-**

२३३ मध्ये जस दुसऱ्या त्याने दिल्या हे आपल्याला मिळण सोप आहे की लांबच? दृष्टीपथक काय आहे?

**प्रमोद सामंत :-**

साडेचार हजार स्क्वेअर मीटरपैकी सी.आर.झेड किती आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

नॉन सी.आर.झेड आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यावर कोणाच अतिक्रमण आहे की, कोणाच्या पजेशनमध्ये आहे की वॅकेंट आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

गर्व्हमेंटच पजेशन गर्व्हमेंटची मालकी.

**रोहिदास पाटील :-**

आता जागेवर काय आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

जागा मोकळी आहे.

**प्रमोद सामंत :-**

बाजाराच काय झाल. १ वर्ष पूर्ण गेल.

**दिपक सावंत :-**

बाजार लिलावाची मुदत १५ तारखेला संपते. त्या संबंधीत टेंडर काढण्यासाठी आयुक्त साहेबांची मंजुरी घेतलेली आहे. आयुक्त साहेबांनी फक्त अटीशर्ती आहेत. त्याच्यामध्ये कल्याण आणि वसई विरार जिथे वसुलीचा बाजार ठेका दिला जातो. तिथली इनकॉर्पोरेट करुन टेंडर पब्लीश करण्यासाठी सांगितलेल आहे. तर ते हे ८ दिवसामध्ये टेंडर पब्लीश करायला सरांनी मंजुरी दिलेली आहे.

**प्रमोद सामंत :-**

पब्लीश करायला आठ दिवस का लागणार? मंजुरी दिलेली आहे ना.

**दिपक सावंत :-**

मंजुरी दिले. पण सरांनी सांगितल की ते इनकॉर्पोरेट करा. आणि मगच करा. तिकडच्या कंडीशन काय आहे त्या चेक करा.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही आठ दिवस त्या चेक करणार?

**दिपक सावंत :-**

आठ दिवस चेक करायला नाही लागणार. आठ दिवसाची मुदत राहणार फक्त. त्याच्यानंतर लगेच इम्प्लीमेंट करणार ठेका. १० टक्के वाढ करुन अपसेट प्राईज फिक्स करणार. आता जे चालू आहे त्याच्यात १० टक्के ॲड करुन आपली प्राईज फिक्स करणार.

**राजेश वेतोसकर :-**

दोन वर्षापूर्वी ठेका नक्की केला होता ना?

**दिपक सावंत :-**

गेल्यावर्षी केला होता.

**प्रमोद सामंत :-**

गेल्यावर्षी त्यांना मुदतवाढ दिलेली.

**दिपक सावंत :-**

गेल्यावर्षी नवीन ठेका काढला होता. ऑक्शन केल होत.

**राजेश वेतोसकर :-**

गेल्यावर्षी नाही केल.

**प्रमोद सामंत :-**

ऑक्शन कुठे केल होत?

**दिपक सावंत :-**

गेल्यावर्षी ऑक्शन केल होत ५५ लाख ..............

**प्रमोद सामंत :-**

साहेब, ह्यासाठी बोलण्यात १५ मिनिट घेतली की, आपल्याकडे एल.बी.टी आणि कर हे दोनच महसुलाच्या बाजू आहेत. आणि त्यामध्ये जेवढे लॅपसेस आपल्याकडे असतील. तेवढा आपला महसुल कमी जमा होणार. आणि महसुल कमी झाला की, तर आपण कुठलही विकास काम करुन शकत नाही. ह्यासाठी एवढ बोलण होत. सावंत साहेबांकडे ३ वर्षापासून कर हा विषय आहे. बाजार फी हा विषय आहे. आणि त्यामध्ये जर आपण सुसुत्रता जर आणली नाही तर ह्यापुढे ही आपल असच चालत राहील अस वाटते. म्हणुन एवढ सगळ बोलायला दिल्याबद्दल सभापती साहेब तुमचे धन्यवाद. आणि सावंत साहेबांच अभिनंदन त्यांनी पाठपुरावा करुन १०० बसेसच प्रपोजल सँक्शन केल. पण ते करताना डेपोची जागा वैगेरे करावी. मग १०० बसेस आल्या तरी चालतील. धन्यवाद.

**बर्नड डिमेलो :-**

सन २०१३-२०१४ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१३ ते ३० जून २०१३ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०१३-२०१४ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१३ ते ३० जून २०१३ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०१ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (दि. १ एप्रिल २०१३ ते दि. ३० जुन २०१३) (दि. २८/०८/२०१३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७३)

**ठराव क्र. ९० :-**

सन २०१३-२०१४ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१३ ते ३० जून २०१३ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेवून आजची सभा सन २०१३-२०१४ आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल २०१३ ते ३० जून २०१३ पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्चास मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समित**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०२, निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मिरारोड (पू.) शांती गार्डन सेक्टर नं. ४ मधील (रामनगर डेव्हलपर्स ऑफिस समोरील) ते सेंट पॉल शाळा मुख्य नाल्यापर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे**<br>**१. मे. शिवम लॅन्डस्केपर्स**<br>२. इंद्रा कंस्ट्रक्शन<br>३.मे. एकता कंस्ट्रक्शन<br>६.मे. कंचन कंस्ट्रक्शन कं.<br>४.मे. राठोड ब्रदर्स<br>५.मे. राठोड असोशिएटस् | **रु. २७,६७,४००/-**<br>**१८.१८% कमी दराने**<br>१६.२% कमी दराने<br>२.००% कमी दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>३.००% जास्त दराने<br>५.००% जास्त दराने | दि.२१/५/२०१३ | दै. पुकार/<br>दै. फ्री प्रेस जरनल<br>दि.२७/०८/२०१३ | दि २८/८/२०१३ |

अ.क्र.१ च्या कामी **मे. शिवम लॅन्डस्केपर्स** यांची **१८.१८% कमी दराची निविदा** ही सर्वात कमी दराची आहे. सदर निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०२ :-**

निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ९१ :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मिरारोड (पू.) शांती गार्डन सेक्टर नं. ४ मधील (रामनगर डेव्हलपर्स ऑफिस समोरील) ते सेंट पॉल शाळा मुख्य नाल्यापर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे**<br>**१. मे. शिवम लॅन्डस्केपर्स**<br>२. इंद्रा कंस्ट्रक्शन<br>३.मे. एकता कंस्ट्रक्शन<br>६.मे. कंचन कंस्ट्रक्शन कं.<br>४.मे. राठोड ब्रदर्स<br>५.मे. राठोड असोशिएटस् | **रु. २७,६७,४००/-**<br>**१८.१८% कमी दराने**<br>१६.२% कमी दराने<br>२.००% कमी दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>३.००% जास्त दराने<br>५.००% जास्त दराने | दि.२१/५/२०१३ | दै. पुकार/<br>दै. फ्री प्रेस जरनल<br>दि.२७/०८/२०१३ | दि २८/८/२०१३ |

अ.क्र. १ च्या कामी **मे. शिवम लॅन्डस्केपर्स** यांची **१८.१८% कमी दराची निविदा** ही सर्वात कमी दराची आहे. सदर निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समित**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०३, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

साहब, यह सॉफ्टवेअर के लिए खर्चा किया ना अपने-अपने मिरा भाईंदर नगरपालिका में अभी तक अलग-अलग डिपार्टमेंट में सॉफ्टवेअर के लिए बहुत कुछ खर्चा किया है। और बादमें रद्दी के टोकरी में गए हुए है। ३-३, ४-४ मॉडेल्स तो युज भी नहीं किए है। पैसा भरपुर दिया है। अभी यह जो बनाए है आपने इतने सारे ४ लाख, २ लाख. यह सब कार्य अगर ढंग से नहीं हुआ तो उनका पॅनल्टी प्रोसिजर क्या है? अगर वह काम नहीं कर पाए तो उनके पास उसके अंदर कुछ अटिशर्ती है क्या? और उसको डिफाईन कैसे करेंगे की, काम यह नहीं कर रहे है। या अपने गलती से नहीं हो रहा है।

**मनस्वी म्हात्रे :-**

सर, त्यांचे पेमेंट अजुन आपण दिलेल नाही.

**प्रमोद सामंत :-**

पेमेंट न देण हा विषय नाही. त्यांच्याकडुन काम पूर्ण झाल की, एक वर्षाने त्यांना पेमेंट पूर्ण करायच.

**अतिरिक्त आयुक्त :-**

त्यांनी काम पूर्ण केलेल आहे.

**राजेंद्र जैन :-**

काम पुरा होने का बात नहीं है। बात यह है की, हम उनके उपर डिपेंड कर रहे है। हमारा एक-एक दिन वेस्टेज हो रहा है। वह बोलेंगे हमको काम नहीं है। उसको पॅनल्टी कितनी है? जिम्मेदारी वाला काम है।

**मनस्वी म्हात्रे :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते, सॉफ्टवेअर जे खरेदी केले ते एक वर्षापूर्वी केले होते. आपण त्याच्यामध्ये फस्ट फेज आणि सेकंड फेजमध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट डिफाईन केल होत. त्याप्रमाणे त्यांनी सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट केल आहे की नाही हे सगळ डिपार्टमेंटकडून अप्रुव्हड केल्यानंतरच त्यांना पेमेंट केलेल आहे. त्याच्यामुळे जेव्हा परचेस केल त्यावेळेला जे डिफाईन केल होत त्या सगळ्या गोष्टी त्याच्यामध्ये इम्प्लीमेंट झाल्या आहेत.

**राजेंद्र जैन :-**

यह सॉफ्टवेअर परचेस कर रहे है। इसका वॅल्यु कौन करेगा?

**मनस्वी म्हात्रे :-**

डिपार्टमेंट.

**राजेंद्र जैन :-**

आपका?

**मनस्वी म्हात्रे :-**

नहीं। कन्सल्ट डिपार्टमेंट. डिपार्टमेंट के लोग उसपर काम कर रहे है।

**राजेंद्र जैन :-**

हम लोग किसी को कॉन्ट्रॅक्ट नहीं देंगे ना? खुद करेंगे ना।

**मनस्वी म्हात्रे :-**

खुद करेंगे।

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आमची एक विनंती होती की, महापालिका दरवेळी कोणाकोणाकडून सॉफ्टवेअर आणते. आपण त्यातले तज्ञ नसल्यामुळे आपण सगळ्या गोष्टीला हो म्हणत असतो. आपण त्याच्यावर नकार देत नाही. त्यांनी मागितलेले पैसे आपण देत राहतो. अनेक वर्ष, शिंदे साहेबांकडून कल्याण सॉफ्टवेअर इकडे आल. किती वेळ चालल, किती पेमेंट केल. त्याचा आकडा इथे कोणीही बसलेला अधिकारी आज सांगु शकणार नाही. आपण असा का प्रयत्न करत नाही की, महापालिकेच्या वतीने सॉफ्टवेअर डेव्हलप व्हाव. ह्या महापालिकेच्या हद्दीमध्ये अनेक अशा संस्था कार्यरत आहेत. मी अभिमानाने सांगेन. आपल कॉलेज चालते. द्या मुलांना एक संधी. १ रु. तुम्ही देऊ नका. जर सॉफ्टवेअर निट सोयीच झाल जनतेच्या हिताच, अधिकाऱ्यांच्या हिताच, महापालिकेच्या हिताचे झाले. तर पाच ओळीच पत्र द्या. पण, त्या मुलांना संधी द्या. होतकरु मुल आपली आहेत. तशी इच्छा नसेल, काकांच कॉलेज आहे. म्हणुन काका मागतात, तर तस देऊ नका. अनेक संस्था आहेत. त्यापैकी कोणाच तरी घ्या, मुलांना संधी द्या. त्यांच्याकडून कोणतीही आयडीया येते. आपल्याला सॉफ्टवेअर दाखवते त्याची कुठे शाश्वती नाही. ते चालते की नाही चालते ते. नाही चालते म्हणून आपण गप्प राहतो. आपल्याला गाव सगळ नागरिक सगळीकडे थु-थु होते. कोणाला मनाला किती वाटते ते देव जाणे. पण आम्हाला अस वाटते की, एवढे पैसे देतो, सगळे देतो, अनेक संस्थांनी अनेक कामे निट होतात. महापालिकेच कामकाज का होत नाही? मी तुम्हाला उदाहरण देतो. त्या शवगृहामध्ये १ संगणक पाहिजे. मा. सभापती साहेब, तुम्ही आम्हाला काय उत्तर देता

आम्ही समाधानी आहोत. पण, काहीतरी उत्तर पाहिजे की नाही? आपण, एक संगणक देऊ शकत नाही. महापालिकेच कामकाज चालले ही काय पध्दत आहे कामकाजाची?

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, काकांनी चांगला प्रस्ताव दिलेला आहे. तुम्ही विद्यार्थ्यांना द्याना एक संधी द्यायला काय हरकत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, काकांनी विषय काढला तो चांगला आहे. आता जे सॉफ्टवेअर चालल ते त्या संस्थेला देऊन त्यांनी डेमो बनवून द्यावा. कोणत्या प्रकारे चालवू. तोपर्यंत त्यांना ठेका दिला अस होत नाही. डेमो दिला आणि त्यांची प्रणाली कोणत्या प्रकारची आपल्याला सोईस्कर आणि चांगली आहे. जे एक बटन दाबल की, आपल्यापुढे सर्व चित्र येईल. ह्या प्रकारचे नवीन टेक्नॉलॉजी वापरुन करत असतील तर मला वाटते कॉलेजला परवानगी द्या. आपला एक अधिकारी तिथे बसेल. त्याला कोणकोणत्या अडचणी आहेत त्या जर सांगितल्या. तर मला वाटते कॉलेज आपल्याला डेमो दाखवतील. आणि ह्याप्रकारची टेक्नोलॉजी वापरावी. नंतर आपण विचार करु.

**प्रकरण क्र. १०३ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)

**ठराव क्र. ९२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत मालमत्ता कर, पाणीपुरवठा कर व जन्म-मृत्यू इत्यादी विभागांकरिता मे. न्यु इंडीकट्रान्स यांचेमार्फत तयार करण्यात आलेली आज्ञाप्रणाली कार्यन्वित करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | तपशिल | मंजुर दर |
|---|---|---|
| 1. | Design & Development of Property Tax Management Software. | रु. ४,०३,०००/- (अधिक सेवा कर) |
| 2. | Design & Development of Birth & Death Management Software. | रु. २,०५,०००/- (अधिक सेवा कर) |
| 3. | Design & Development of Water Bill & Management Software. | रु. ४,०५,०००/- (अधिक सेवा कर) |

त्यापैकी मालमत्ता कर विभागामार्फत प्रणालीमध्ये कर विभागामार्फत वारंवार सुचविण्यात येणा-या दुरुस्त्या तथा नविन सेवा सुविधा यांचा समोवश करणेकरीता सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मे. न्यु इंडीकट्रान्स यांचेमार्फत पुर्णवेळ **Java** प्रणाली तंत्रज्ञ मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात कार्यान्वित करणेकरिता मा. आयुक्त सो. यांचे दि. २३/०१/२०१३ रोजीची मंजुरीनंतर खालीलप्रमाणे दर मंजुर करुन दि. ३१/०१/२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला.

| Sr. No. | Resource Profile | Unit | Per Month Cost |
|---|---|---|---|
| 1. | Thorough knowledge of existing Property Tax application<br>Thorough knowledge of Property Tax database structure<br>Experience in Java language<br>Experience in RDBMS like Oracle, Postgresql etc<br>Experience in procedures, triggers<br>Good in XML and Web services<br>Practical experience of 2+ yrs<br>Ready to adopt technology<br>Good in communication and management | 1 | Rs. 33,300/- |

उपरोक्त कामाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूचि ‘‘ड’’ मधील प्रकरण ५(२) (२) अन्वये अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ सायं. ६.०५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**